१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार ६ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 93 Marathi - Daily - Mumbai, 6 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे    24x7 : www.navakal.in    Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

कॉकरोच जनता पार्टीला अमित ठाकरेंचा पाठिंबा!

navakal.in

@navakal.news    Navakal Digital Network    @_NDN_Offical    @NavakalNews

# कॉकरोच जनता पार्टीचा आज दिल्लीत एल्गार अभिजित दीपकेला विमानतळावर अटक होणार?

**कॉकरोच जनता पार्टीच्या रुपाने अवघ्या महिन्याभरात केंद्र सरकारसमोर मोठे आव्हान उभे करणारा अभिजित दीपके उद्या अमेरिकेहून दिल्ली विमानतळावर सकाळी ८ वाजता दाखल होणार आहे. विमानतळावरून तो थेट पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यावर जाऊन जंतरमंतर येथे आंदोलन करण्याची परवानगी मागणार आहे. नीट यूजी आणि सीबीएसई परीक्षांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, या प्रमुख मागणीसाठी पार्टीतर्फे हे पहिले आंदोलन करण्यात येणार आहे. दीपकेला जेवढ्या प्रचंड प्रमाणात इंटरनेट आणि सोशल मीडियावर लोकांचा प्रतिसाद दिला आहे ते पाहता उद्या दिल्लीत हजारो समर्थक रस्त्यावर उतरणार आहेत. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस दीपकेला विमानतळावरच अटक करण्याची शक्यता आहे.**




■ नवी दिल्ली

**सरन्यायाधीश** सूर्य कांत यांनी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान देशातील बेरोजगार युवकांना झुरळाची उपमा दिली. सरन्यायाधीशांच्या या आक्षेपार्ह वक्तव्यावर उपरोधिक टीका करण्यासाठी अभिजित दीपकेने सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टीची स्थापना केली. तेव्हा दीपके हा शिक्षणासाठी अमेरिकेत होता. बघता बघता कॉकरोच जनता पार्टीचे लोण एखाद्या वणव्यासारखे पसरले. अवघ्या दोन दिवसांत दीपकेच्या फोलोअरची संख्या काही लाखांच्या पार गेली. सुमारे महिन्याभरात ही दोन कोटींवर जाऊन पोहोचली आणि त्यानंतर सोशल मीडियावर जन्मलेल्या या आभासी पक्षाला प्रत्यक्ष जमिनीवर उतरवण्याचा निर्णय अभिजितने घेतला. युवकांचा पक्ष असल्याने सर्वप्रथम नीट आणि सीबीएसई परीक्षांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांचा मुद्दा उचलून धरत अभिजितने उद्या ६ जून रोजी दिल्लीत आंदोलनाची हाक दिली. तेव्हापासून कॉकरोच जनता पार्टीकडे गांभीर्याने पाहिले जाऊ लागले आहे. उद्याचे आंदोलन या पक्षाची भावी वाटचालीची दिशा ठरवणारे आहे.

आंदोलनाच्या एक दिवस आधी म्हणजे आज अभिजितने सोशल मीडियावर पुन्हा एक व्हिडिओ जारी करून अत्यंत सावध भूमिका घेतली. कृपा करून उद्या कोणीही दिल्ली विमानतळावर येऊ नका. मी विमानतळावरून थेट पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जाईन. तिथेच तुम्ही सर्वजण या. आपण पोलिसांकडून रितसर परवानगी घेऊ आणि नंतर जंतर मंतरवर जाऊन शांततापूर्ण निदर्शने करू. आपल्यामुळे कोणालाही त्रास होता कामा नये. सुरक्षा यंत्रणेवरही ताण येता कामा नये. आपल्याकडून कधी चूक होते याकडे सरकारचे बारकाईने लक्ष असेल. आपण त्यांना मुळीच संधी द्यायची नाही, असे अभिजित दीपके याने नव्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे. दरम्यान दीपकेचे आईवडील सुरक्षेसाठी त्यांचे राहते घर सोडून अज्ञातस्थळी गेले आहेत. उद्याच्या आंदोलनात माझ्याशिवाय मंचावर इतर कुणीही असणार नाही असे अभिजीतने सांगितले असले तरी त्याच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्यासारखी अनेक दिग्गज उद्या आंदोलनात सहभागी होणार आहेत. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान » पान ७ वर

## जनहित याचिकेवर तातडीची सुनावणी नाही

उद्याच्या आंदोलनाच्या विरोधात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर तातडीची सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. सेव्ह इंडिया फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने ही जनहित याचिका दाखल केली होती. आंदोलनाच्या आयोजकांना प्रतिबंधात्मक आदेश देणे आणि संभाव्य गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाला आदेश देणे अशा मागण्या याचिकेद्वारे करण्यात आल्या होत्या.

## आंदोलन इंटरनेटपुरते नको सार्थकची सीजेपीला सूचना

सीबीएसईच्या परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकार उघडकीस आणणारा विद्यार्थी सार्थक सिद्धांत याने सीजेपीचा संस्थापक अभिजित दीपके याला महत्त्वाची सूचना केली आहे. हे आंदोलन केवळ इंटरनेटवर प्रसिद्धी मिळवण्यापुरते असू नये. त्यातून काहीतरी साध्य झाले पाहिजे आणि आंदोलन रास्त मुद्यांवर झाले पाहिजे, अशी सूचना सार्थकने दीपकेला केली आहे.

# मराठा आंदोलनातील ३४ मृतांच्या वारसाला १० लाख रुपये मंजूर



**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात झालेल्या विविध आंदोलनांमध्ये मृत्यू झालेल्या ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना राज्य सरकारने आर्थिक मदत जाहीर केली आहे. प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय ओबीसी समाजाला लागू असलेल्या ८ शैक्षणिक सवलती मराठा समाजाला लागू करण्याचा निर्णयही सरकारने घेतला. मनोज जरांगे-पाटील यांच्या अनेक मागण्यांपैकी या दोन मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.**

■ मुंबई

**मराठा** समाजाच्या विविध मागण्यांसाठी झालेल्या आंदोलनांदरम्यान राज्यात एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने या मृतांच्या वारसदारांसाठी यापूर्वीच २७ कोटी ५० लाख रुपयांची मदत मंजूर केली होती. त्यापैकी ३४ कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते. अंतरवाली सराटी येथे ३० मे रोजीच्या मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे-पाटील यांनी या उर्वरित वारसदारांना आर्थिक मदत देण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस » पान ५ वर

# दहावी पास पात्रतेची नोकरी पदवीधराला देता येणार नाही

■ नवी दिल्ली

**कमी** शैक्षणिक पात्रतेसाठी राखीव असलेल्या नोकऱ्यांवर उच्च शिक्षित उमेदवारांची नियुक्ती करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

अशा नियुक्त्यांमुळे पात्र आणि कमी शिक्षित उमेदवारांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जातात, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

तामिळनाडूमधील सिंडीकेट बँकेतील प्रकरणात हा निकाल देण्यात आला. अटेंडंट पदासाठी दहावी उत्तीर्ण ही पात्रता असताना संबंधित व्यक्तीने आपण पदवीधर असल्याची माहिती लपवून नोकरी मिळवली होती. हा प्रकार उघड झाल्यानंतर बँकेने त्याला निलंबित केले होते. या निर्णयाविरोधात संबंधित व्यक्तीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने त्याच्या बाजूने निकाल दिला होता.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय रद्द करत बँकेचा निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने स्पष्ट केले की, काही नोकऱ्या या कमी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठीच असतात.

# सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे पण महागाई वाढीचा अंदाज



■ नवी दिल्ली

**रिझर्व्ह** बँकेने नवीन आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या बैठकीत रेपो दरात कोणताही बदल न करता तो ५.२५ वर कायम ठेवला आहे. रिझर्व्ह बँकेने सलग तिसऱ्यांदा रेपो रेटमध्ये वाढ केलेली नाही. मात्र २०२७ मध्ये महागाईचा अंदाज ४.७ टक्क्यांवरून वाढवून ५.१ टक्के केला आहे. त्यामुळे पुढील वर्षी महागाई वाढणार आहे. तर पश्चिम आशियामध्ये (मध्य पूर्व) सुरू असलेला तणाव आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे रिझर्व्ह बँकेने आर्थिक विकास दर म्हणजेच जीडीपी वाढीचा अंदाज कमी केला आहे. आता चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज ६.९ टक्क्यांवरून ६.६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. या निर्णयामुळे गृह आणि वाहन कर्ज घेणाऱ्या सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचा मासिक हप्ता वाढणार नाही. महागाईच्या वाढत्या जोखमी असूनही, चलनविषयक धोरण समितीने आपले धोरण 'न्यूट्रल' (तटस्थ) ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. संजय मल्होत्रा म्हणाले की, सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचे सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

मल्होत्रा यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळे निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केले. ते म्हणाले की, किरकोळ महागाई सध्या लक्ष्याच्या आत असली तरी, जागतिक तणावामुळे इंधन आणि ऊर्जेच्या वाढत्या किमती भविष्यात किरकोळ बाजारपेठेवर आणि सामान्य जनतेच्या खिशावर दबाव आणू शकतात.

# महाराष्ट्र, दिल्लीमध्ये लवकरच १०० इथेनॉल पंप सुरू होणार

■ नवी दिल्ली

**कच्च्या** तेलावरील अवलंबित्व कमी करण्याच्या धोरणाचा भाग असे सांगत देशात इथेनॉलच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकार दिल्ली राजधानी प्रदेश (एनसीआर), मुंबई, पुणे आणि नागपूर येथे ५० ते १०० इथेनॉल पंप सुरू करणार आहे, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी दिली.

२०२६ च्या अखेरीस इथेनॉल पंपांचे जाळे ५०० पर्यंत वाढवण्याची सरकारची योजना आहे. भारतातील पहिल्या फ्लेक्स-इंधनावर चालणाऱ्या कारच्या अनावरणप्रसंगी पुरी बोलत होते. याप्रसंगी पुरी म्हणाले की, २०२७ च्या अखेरीस भारतात ५ हजार इथेनॉल पंप असतील, अशी अपेक्षा आहे. बाजारात येणारी निम्मी वाहने फ्लेक्स इंधनावर चालल्यास भारतात ३११.८ कोटी लीटर इथेनॉलची गरज भासेल. इथेनॉलची विक्री करून शेतकऱ्यांना १२,४०३ कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळू शकेल.

पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आले आहे. त्यामुळे १.८४ लाख कोटी रुपयांची परकीय चलन बचत झाली आहे. इथेनॉलचा मुद्दा केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्यामुळे खूप गाजला. नितीन गडकरी व केंद्रीय नेते ३० टक्के इथेनॉल वापरावे यासाठी आग्रही आहेत. मात्र सध्याच्या गाड्या या १० टक्क्यांपेक्षा अधिक इथेनॉल वापरू शकत नाही.

# रिक्षा-एसटीला इंधन महागाईचा फटका

■ मुंबई

**राज्यभरात** स्कूल बसच्या भाडेवाढीनंतर आता एसटी बस आणि रिक्षा भाडेवाढीची शक्यता निर्माण झाली आहे. वाढत्या इंधन दरांमुळे प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी प्रवाशांवर तातडीने भाडेवाढीचा बोजा टाकला जाणार नाही, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने वाहतूक क्षेत्रावरील खर्च वाढला आहे.

## भाडेवाढीची शक्यता



अलीकडेच सीएनजी, पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे रिक्षा आणि सार्वजनिक वाहतूक सेवांवरील आर्थिक ताण वाढल्याने भाडेवाढीची मागणी जोर धरू लागली आहे. मुंबई रिक्षामेन्स युनियनने रिक्षा भाडेवाढीसंदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) निवेदन सादर केले आहे. त्यानुसार अंधेरी आरटीओने भाडेवाढीचा प्रस्ताव तयार करून पुढे पाठविला आहे. या प्रस्तावावर मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण (एमएमआरटीए) च्या आगामी बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

# 'त्या' कलिंगडमध्ये विष नव्हतेच फोरेन्सिक अहवालामुळे गूढ वाढले

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील पायधुनी परिसरात राहणाऱ्या डोकाडिया प्रकरणातील गूढ नव्या फोरेन्सिक अहवालामुळे अधिकच वाढले आहे. डोकाडिया कुटुंबियांनी खाल्लेल्या कलिंगडवर, वापरलेल्या चाकूवर, प्लेटसवर, भात, चिकन पुलाव एवढेच नव्हे तर त्यांच्या घरातील उंदीर मारण्याच्या औषधामध्ये कुठेही झिंक फॉस्फॉईड या विषारी रसायनाचे अंश आढळून आले नाहीत, असा निष्कर्ष या नव्या फोरेन्सिक अहवालात काढण्यात आला आहे.

२६ एप्रिल रोजी अब्दुल्ला डोकाडिया (४०), पत्नी नसरीन (३५) आणि आयेशा (१६) व झैनब (१३) या दोन मुली अशा एका कुटुंबातील चार जणांचा अन्न विषबाधेमुळे मृत्यू झाला. आदल्या रात्री त्यांनी आपल्या घरी पाच अन्य नातेवाईकांसह भोजन केले » पान ७ वर

# पर्यावरण बदलाचा अर्थव्यवस्थेलाही फटका बसणार! राज ठाकरेंचा इशारा

■ मुंबई

**जागतिक** पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पर्यावरणाच्या बिघडत्या



स्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त करत अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसत असल्याचा इशारा दिला.

राज ठाकरे म्हणाले की, मागील वर्षी झालेली अतिवृष्टी आणि यंदाचा विक्रमी उन्हाळा लक्षात घेतला तर पर्यावरण दिनाकडे केवळ औपचारिकतेपलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. आपल्याकडे प्रत्येक गोष्ट उत्सवाप्रमाणे साजरी करण्याची सवय असून, पर्यावरण दिन आला की झाडे लावली जातात, फोटो काढले जातात आणि सोशल मीडियावर टाकले जातात. मात्र त्यातील बहुतांश झाडे संध्याकाळपर्यंत टिकत नाहीत. काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने कोट्यवधी झाडे लावल्याचा दावा केला होता, पण ती झाडे नेमकी कुठे आहेत याचे उत्तर आजही स्पष्ट नाही. पर्यावरण बदलामुळे आपण काय गमावले आहे आणि पुढे काय गमावणार आहोत, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. २०१४ मध्ये सादर » पान ७ वर






# पर्यावरणाचे रक्षक शांत का?

- मुंबईची तहान भागवण्यासाठी
- ३,१०,४१० वृक्षांचा, असंख्य
- पक्षी, प्राणी व जैवविविधतेचा बळी

**पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामधे बांधण्यात येणाऱ्या गारगाई धरणामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा कायदा बासणात गुंडाळून ठेवून ६ आदिवासी गावांतील व १३ पाड्यांतील आदिवासी बांधवांवर अन्याय केला जात आहे. मुंबई महानगरपालिकेने गारगाई धरणाच्या बांधकामासाठी ठेकेदारास २३/०४/२०२६ रोजी वर्क ऑर्डर देऊन प्राथमिक स्तरावर बांधकामास सुरुवात केली आहे. ऑक्टोबरमधे या धरणाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात केली जाणार असल्याची घोषणा महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काय? असा प्रश्न विचारला जात असतानाच या भागातील पर्यावरणाचा का विचार केला जात नाही? असा प्रश्न सर्वांनाच सतावताना दिसतो आहे.**

**या धरण** परिसरातील सुमारे ३,१०,४१० झाडांची अक्षरशः कत्तल केली जाणार आहे. असंख्य पक्षांचे व प्राण्यांचे बळी जाणार आहेत. जैवविविधता धोक्यात येणार आहे. नदी- नाल्यांचे प्रवाह बदलणार आहेत. मोठ्या जलाशयामुळे स्थानिक भागातील तापमान, आर्द्रता व पर्जन्यमानाच्या पद्धतीमध्ये काही प्रमाणात बदल होईल. तानसा व गारगाई नदींचा नैसर्गिक प्रवाह बदलेल. त्यामुळे खालच्या भागातील परिसंस्थेवर त्याचा परिणाम होईल. जलचर जीवसृष्टीसाठी गंभीर परिणाम होतील. एक मोठे वनक्षेत्र पाण्याखाली जाईल. एकूणच या धरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे आणि तरीही पर्यावरणप्रेमी शांत आहेत, हे विशेष.

गारगाई धरणासाठी तुटली जाणारी झाडे ही खूप मोठी समस्या आहे. हा प्रकल्प तानसा अभयारण्यामध्ये होतो आहे. एक पूर्ण अभयारण्य उद्ध्वस्त केले जाणार आहे. सुमारे ८४० हेक्टर जमीन या प्रकल्पामुळे बाधित होणार आहे. त्यामधे तब्बल ६५८ हेक्टर वनजमीन आहे. १७० हेक्टर खासगी, गावठाण व शासकीय जमीन आहे. हा भाग पूर्णतः घनदाट जंगलाचा आहे. त्यामुळे किती झाडे तुटणार? ही बाब केवळ आकड्यांशी नाही तर संपूर्ण परिसंस्थेच्या अस्तित्वाशी संबंधित आहे.

महानगरपालिका म्हणते की, आम्ही जेवढी झाडे तुटतील त्याच्या तीनपट झाडे लावू. मात्र मोठ्या झाडाचे पर्यावरणातील मुल्य आणि नव्याने लावण्यात येणाऱ्या रोपाचे पर्यावरणीय मुल्य यामध्ये जमीन आसमानाचे अंतर आहे. पुन्हा ही झाडे चंद्रपूर, हिंगोली व वाशिम जिल्ह्यातील ६५८ हेक्टर जमिनीवर लावली जाणार आहेत. अभयारण्यातील झाडे तोडून ही दुसऱ्या जिल्ह्यांमधे लावल्यानंतर त्याचा ठाणे व पालघर जिल्ह्यातील जनतेला काय फायदा? या दोन्ही जिल्ह्यांमधे लाखो वृक्ष तोडल्यानंतर होणाऱ्या परिणामांना जबाबदार कोण? या दृष्टीनेही विचार होणे गरजेचे आहे. म्हणूनच पर्यावरणीय मूल्यांकन आणि वन्यजीव संरक्षणाला प्राधान्य देण्याची गरज आहे.

ज्या परिसरामध्ये हे धरण होतेय तो भाग पश्चिम घाट आहे. तो जगातील जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. या भागातील जंगलांमध्ये असलेल्या असंख्य वनस्पती, औषधी वनस्पती व दुर्मीळ प्रजातींचा अधिवास नष्ट होणार आहे. पक्षी, प्राणी व सुक्ष्मजीवांचे अस्तित्व जंगलांवर अवलंबून असते. ३,१०,४१० झाडांची कत्तल केल्यानंतर जंगलांचे नैसर्गिक संतुलन बिघडणार आहे. झाडे केवल ऑक्सिजनच देत नाहीत तर पाऊस, तापमान, भूजल व मातीचे संरक्षण यामधेही महत्त्वाची भूमिका बजावतात. या वृक्षतोडीमुळे स्थानिक तापमानामधेही बदल होणार आहे. मृदाक्षरण वाढणार आहे आणि जलस्त्रोतांवरही मोठा परिणाम होणार आहे.

झाडांच्या मुळांमुळे माती धरून ठेवली जाते. वृक्षतोड झाल्यानंतर मृदाक्षरण वाढेल, माती वाहून जाईल. लहान नाले, झरे व भूजल पुनर्भरणावर गंभीर परिणाम होतील. जंगलावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होतील. वनउत्पादने, सरपण, फळे, फुले व चरई क्षेत्र कमी होईल. सांस्कृतिक व पारंपारिक निसर्गसंवर्धन जीवनशैलीच नष्ट होईल. वनसंपदा, वनचर प्राणी, पक्षी, नैसर्गिक साधनसामग्री संपवून व जैवविविधतेवर घाला घालून मुंबईच्या तहानेसाठी हा प्रकल्प लादला गेला आहे, तरीही पर्यावरण प्रेमींचा कुठलाही विरोध नाही. यामागचे नेमके कारण काय?

जंगलातील पशु - पक्ष्यांवर वृक्षतोडीचा सर्वाधिक परिणाम होणार आहे. या जंगलामधील पक्षांची लाखो घरटी उद्ध्वस्त होणार आहेत. प्राण्यांच्या अधिवासावर व त्यांच्या अन्नसाखळीवर गंभीर



परिणाम होणार आहेत. प्राण्यांचा अधिवास नष्ट झाल्याने वन्यजीव मानवी वस्त्यांकडे वळतील. त्याचे परिणामही सर्वांनाच भोगावे लागतील. गारगाई धरणाचा प्रश्न केवळ पाणीपुरवठ्याचा नाही तर तो पर्यावरण, जैवविविधता, आदिवासी हक्क व शाश्वत विकास यांच्याशीही निगडित आहे. म्हणूनच विकास आणि पर्यावरण यांच्यामध्ये संतुलन राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय नुकसान कमी करण्यासाठी पर्यायी उपाय, पारदर्शक पर्यावरणीय मूल्यांकन आणि स्थानिक लोकांचे जीवनमान यांचाही विचार करणे अत्यावश्यक आहे. मात्र तो न करताच या धरणाचा घाट घातला गेला आहे. त्याचे दुष्परिणाम भविष्यामध्ये परिसरातील जनतेला भोगावे लागतील.

गारगाई धरणाच्या परिसरामध्ये अनेक दुर्मीळ व औषधी वनस्पती आढळतात. नामशेष झालेले भारतीय घुबडही याच जंगलामध्ये आढळते. मांजर, ठिपक्यांची मांजर, भारतीय साळींदर, लालसर रंगाचे मुंगूस, लहान आकाराच्या भारतीय कांडचोर, पट्टेदार तरस, भारतीय खवळ्या मांजर असे ५० पेक्षा जास्त प्रकार सस्तन प्राण्यांचे आढळतात. ४ शिंगांचे काळविटही आढळते. या भागामधे १९८० पर्यंत वाघ दिसत होते, असे भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्वेक्षण संघटनेने १९९२ मध्ये केलेल्या अभ्यासात म्हटले आहे.

रानपिंपळा या दुर्मीळ पक्षांचा अधिवासही याच जंगलामध्ये आढळतो. बिबटे, सांबर, रानडुक्कर, भेकर, ससे, खारी

**- शरद यशवंत पाटील**

यांच्यासारखे अनेक लहान - मोठे सस्तन प्राणी आहेत. २१२ प्रकारचे पक्षी, मोर, खंड्या, सुतार पक्षी, घुबडांच्या विविध प्रजाती, स्थलांतरीत व अनेक स्थानिक वनपक्षांचा जंगलामध्ये अधिवास आहे. ७० प्रजातींचे साप, नाग, घोगस, धामण यांसारखे विविध प्रकारचे साप, सरडे, कासवांच्या प्रजाती व असंख्य सरपटणारे प्राणी आढळतात. पश्चिम घाट हा बेडकांच्या अनेक स्थानिक प्रजातींसाठीही प्रसिद्ध आहे. जंगल नष्ट झाल्यास आणि जलस्त्रोत बदलल्यास त्यांच्यावरही मोठा परिणाम होईल. शेती, जंगलाची पुनर्निर्मिती आणि अन्नसाखळी यासाठी मधमाश्या, फुलपाखरे, भुंगे व परागीकरण करणाऱ्या कीटकांचेही अस्तित्व धोक्यात येणार आहे. ४०० हून अधिक प्रजातींच्या वनस्पती नष्ट होणार आहेत. हे वन्यजीव अभयारण्य व राखीव जंगल खूपच चांगल्या स्थितीमधे आहे, ते उद्ध्वस्त होणार आहे.

हे धरण बांधताना फक्त झाडेच तुटतील असे नाही तर संपूर्ण अधिवासच नष्ट होईल. पक्षांची घरटी, प्राण्यांचे अधिवास, पाण्याचे स्त्रोत, प्रजनन क्षेत्र नष्ट झाल्याने त्यांना स्थलांतर करावे लागेल वा त्यांचा मृत्यू होईल. असंख्य पक्षांची घरटी उद्ध्वस्त होऊन काही पक्षांच्या प्रजाती नष्ट होतील. म्हणूनच पश्चिम घाटातील जंगल हे केवळ वृक्षांचा समूह नसून लाखो वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक आणि सूक्ष्मजीवांचे परस्परावलंबी जीवनचक्र आहे. या संपूर्ण परिसंस्थेवर वृक्षतोडीचा गंभीर परिणाम होऊ शकतो. एकूणच मुंबईकरांची तहान भागवण्यासाठी एका अभयारण्यासह, लाखो पशु - पक्ष्यांवर, वनस्पतींवर व एकूणच जैवविविधतेवर घाला घातला जात आहे.

खरं तर हे धरण बांधताना पर्यावरणीय हानी, वन्यजीवांवरील परिणाम व पुनर्वसन यांचा स्वतंत्र आढावा घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर या प्रकल्पाचा सविस्तर पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास सार्वजनिक करणेही तितकेच गरजेचे आहे. त्याचबरोबर जंगलांचे विखंडन, वन्यजीव मार्गीका आणि स्थानिक समुदायांच्या सहभागासह संवर्धन या दृष्टीनेही गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

मुंबईची तहान भागविण्यासाठी पर्यावरणाची एवढ्या मोठ्या प्रमाणावर हानी करण्याऐवजी पाणी चोरी व पाणी गळती रोखणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी साठवणे, सांडपाण्याचा पुनर्वापर करणे आणि विद्यमान जलस्त्रोतांचे व्यवस्थापन करणे, समुद्राचे पाणी शुद्ध करून वापरणे, यासारखे पर्याय गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक होते. मुंबईच्या एकूण जलपुरवठ्यापैकी सुमारे ३४ टक्के म्हणजेच अंदाजे १३४३ दशलक्ष लीटर पाणी वाया जात आहे. मुंबईतील जलचक्राच्या टिकावासाठी नॉन रेव्हेन्यू वॉटर (NRW) म्हणजे 'ना - पावती' पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. मुंबईच्या पाणीपुरवठ्यासाठी केवळ मोठी धरणे बांधणे हा एकमेव पर्याय नाही. जलसंधारण, पुनर्वापर, गळती, नियंत्रण व इतर जलस्त्रोतांचाही विचार होणे गरजेचे आहे. आदित्य ठाकरे हे पर्यावरण मंत्री असताना त्यांनी पर्यावरणाची हानी होईल म्हणून हा प्रकल्प रद्द केला होता. मात्र त्यांचे सरकार गेल्यानंतर पर्यावरणाचा विचार न करता केवळ मुंबईच्या तहानेचा विचार सुरू आहे. हा ठाणे व पालघर जिल्ह्यातील जनतेवर अन्याय करणारा निर्णय आहे.

या जिल्ह्यातील तापमान वाढीवर मोठा परिणाम होणार आहे. झाडे कार्बन-डाय-ऑक्साइड शोषून घेतात. लाखो झाडे तोडल्यानंतर कार्बन साठवणूक कमी होईल. त्यामुळे तापमान व पावसाच्या स्थानिक चक्रावरही परिणाम होईल. हे परिणाम केवळ परिसरापुरतेच मर्यादित राहत नाहीत तर संपूर्ण नदीखोरे व प्रादेशिक जैवविविधतेवर दीर्घकालीन परिणाम होतील.

२०१४ मध्ये बांधलेल्या मध्य वैतरणा धरणामुळे तानसा अभयारण्य आधीच बाधित झाले आहे. आता या नव्या धरणामुळे हे अभयारण्यच उद्ध्वस्त होणार आहे. मुंबईच्या आरे कॉलनीतील २००० झाडे वाचवण्यासाठी लढणारे अगदी उच्च न्यायालयामधे दाद मागणारे पर्यावरणप्रेमी लाखो झाडे तुटत असताना व एक अख्खे अभयारण्य उद्ध्वस्त होत असताना रस्त्यावर का उतरत नाहीत? ते या वृक्षतोडीला विरोध का करत नाहीत? हाच मोठा प्रश्न आहे.

गारगाई धरणाचा प्रश्न केवळ पाणीसाठ्याचा नसून पश्चिम घाटातील घनदाट जंगल, जैवविविधता, वन्यजीव व आदिवासी बांधवांच्या अस्तित्वाशी निगडित आहे. म्हणूनच विकास व पर्यावरण यांच्यामधे समतोल राखूनच या प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता केवळ मुंबईकरांच्या तहानेसाठी सर्वांनाच उद्ध्वस्त करून या धरणाचा घाट घातला गेला आहे. तरीही या विरोधात कुठल्याही पर्यावरण प्रेमींनी, वन्यजीव अभ्यासकांनी वा सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवलेला नाही. कारण हे धरण ग्रामीण भागातील विशेषतः आदिवासी पड्यामधे होतेय. ग्रामीण व आदिवासी जनता जगली काय? आणि मेली काय? याचे कुणालाच काही कधीच वाटत नाही. म्हणूनच शासन असे निर्णय करण्याचे धाडस करते आहे. याचे गंभीर परिणाम भविष्यात सर्वांनाच भोगावे लागतील.

## सौर कृषिपंपांत महाराष्ट्राचा सर्वाधिक १० लाखांचा टप्पा



■ मुंबई

**सौर** कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे. देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत.

## शेकापचे अरविंद म्हात्रे यांचा विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा

■ उरण

**पनवेल** महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते तथा शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी आपल्या विरोधी पक्षनेते पदाचा राजीनामा महापौरांकडे सादर केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे पनवेलच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, विविध चर्चांना उधाण आले आहे.

राजीनाम्यानंतर प्रसिद्ध केलेल्या आपल्या मनोगतात अरविंद म्हात्रे यांनी पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि जनसेवा या मूल्यांवर आपण कायम विश्वास ठेवून राजकारण केले असल्याचे स्पष्ट केले आहे. पक्षाने वेळोवेळी दिलेल्या प्रत्येक जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन केले असून, पक्षाचे आदेश आणि वरिष्ठांचे निर्देश हे नेहमीच आपल्यासाठी सर्वोच्च राहिल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र अलीकडील काही घडामोडींमध्ये पक्षाच्या आदेशांचे पालन केल्यामुळे आपल्याबाबत गैरसमज निर्माण करण्यात आले.

## अकरावी प्रवेश प्रक्रिया! दुसरी यादी १३ जूनला

■ मुंबई

**इयत्ता** अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून १३ जून रोजी प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे.ही दुसरी गुणवत्ता यादी १३ जून रोजी सकाळी १० वाजता ११ वी प्रवेश अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

पहिल्या प्रवेश फेरीत विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अनलॉक करण्यात आल्याने सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज भाग एक व भाग दोन लॉक करणे बंधनकारक आहे.ज्या विद्यार्थ्यांनी अजूनही अकरावी प्रवेशासाठी अर्ज केलेला नाही, त्यांना ६ ते ९ जून या दिवसांत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. एक ते दहा महाविद्यालयांचे पसंतीक्रम त्यांना अर्जात नमूद करावे लागणार आहेत. पूर्वी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनाही या काळात पसंतीक्रम बदलता येणार आहे. १३ जून रोजी सकाळी दहा वाजता पोर्टलवर कनिष्ठ महाविद्यालयांची यादी प्रदर्शित केली जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी वाटप केलेल्या महाविद्यालयांची यादी दिसेल. महाविद्यालयांना त्यांच्याकडे नंबर लागलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल. १३ ते १६ जून या काळात विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले नाही, त्यांना तेथील प्रवेश रद्द करावा लागणार आहे. १९ जूननंतर तिसरी प्रवेश फेरी जाहीर होणार आहे. प्रवेशाची पाचवी विशेष फेरी मुलींसाठी असणार आहे. १ ते १५ जुलै दरम्यान अकरावीचे वर्ग सुरू होणार आहेत.

## पालिकेच्या 'जेम' पोर्टलवरून उत्पादक गायब असल्याचा आरोप

**शालेय वस्तूंचा पुरवठा मिडलमॅनच्या माध्यमातून**

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने शालेय साहित्य खरेदीसाठी केंद्र सरकारच्या जेम पोर्टलचा वापर सुरू केला आहे. या प्रक्रियेत उत्पादकऐवजी केवळ मध्यस्थ कंत्राटदार समोर येत असल्याचा आरोप काँग्रेसचे गटनेते अशरफ आझमी यांनी केला आहे. यात मूळ उत्पादक गायब झाला असल्याचे आझमी यांनी म्हटले आहे.

काँग्रेसचे गटनेते अशरफ आझमी यांनी सांगितले की, पालिकेने सर्व प्रकारच्या वस्तू आणि सेवांची खरेदी केंद्र सरकारच्या 'जेम' पोर्टलवरून करणे बंधनकारक केले आहे. या पारदर्शक खरेदी प्रक्रियेत मध्यस्थांना आळा घालण्यासाठी पालिकेने थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याचा नियम केला आहे. मात्र, तांत्रिक अटी, इसारा अनामत रक्कम आणि निविदा शुल्काची एकत्रित सुविधा 'जेम'वर नसल्यामुळे मूळ उत्पादक या प्रक्रियेतून गायब होत आहे.

कारण शालेय वस्तूंचा पुरवठा हा मिडलमॅनच्या माध्यमातून होत आहे. पालिका शाळांतील विद्यार्थ्यांना पावसाळ्यासाठी छत्री दिली जाणार आहे. या छत्रीचा पुरवठा करण्यासाठी तीन पुरवठादार समोर आले. मात्र एकच निविदाकार पात्र ठरला आहे. त्यामुळे छत्रीचा पुरवठा कसा होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, छत्री खरेदीमध्ये कोलकाताचा पुरवठादार असून छत्री उत्पादन करणारी सन कंपनी मुंबईत आहे. त्यामुळे पुरवठादाराचा फायदा असून, पालिकेचे नुकसान आहे. शालेय वस्तू खरेदीचे तीन प्रस्ताव मंजूर झाले.



वरळी कोळीवाडा रंगला विविध रंगांत, वरळी कोळीवाड्याच्या जवळपास १०० घरे, गल्ली बिर्ला ओपस पेंट्स आणि दि हेरिटेज प्रोजेक्ट एलिव्हेट अर्बन हेरिटेज यांच्या तर्फे ऐतिहासिक वरळी कोळीवाड्यातील १०० घरांना रंगवले गेले. विविध रंगांमुळे आता येथे पर्यटकही वरळी कोळीवाडा येथे भेट देतील.(छायाः दीपक साळवी)

## अर्ज मागे घेतल्याने काँग्रेसच्या दोन उमेदवारांची हकालपट्टी

■ मुंबई

**विधान** परिषद निवडणुकीत पक्षाची अधिकृत भूमिका डावलून उमेदवारी अर्ज मागे घेतल्याप्रकरणी काँग्रेसने दोन उमेदवारांवर कठोर कारवाई केली आहे. यवतमाळचे काँग्रेसचे उमेदवार साहेबराव कांबळे आणि चंद्रपूरचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून त्यांचे पक्ष सदस्यत्वही रद्द करण्यात आले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पक्ष नेतृत्वाला विश्वासात न घेता आणि वरिष्ठांना अंधारात ठेवून उमेदवारी अर्ज मागे घेतल्याचा ठपका दोन्ही नेत्यांवर ठेवण्यात आला आहे.काँग्रेसकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, साहेबराव कांबळे आणि शैलेश अग्रवाल यांना तात्काळ प्रभावाने पक्षातून निलंबित करण्यात आले असून त्यांचे प्राथमिक सदस्यत्वही रद्द करण्यात आले आहे.

## भिवंडी पालिकेत पर्यावरण दिनी वृक्षारोपण कार्यक्रम

■ भिवंडी

**भिवंडी** शहरातील प्रदुषणावर मात करणेकरिता पर्यावरणाच्या दृष्टीने झाडे लावा झाडे जगवा या बाबत नागरीकांत जनजागृती व्हावी या दृष्टीने 'जागतिक पर्यावरण दिना'चे औचित्य साधुन भिवंडी शहरात ५ जून रोजी वृक्षरोपणाचा कार्यक्रम विविध ठिकाणी आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाअंतर्गत मनपा आयुक्तअनमोल सागर यांनी वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमास महापौर नारायण चौधरी, खासदार सुरेश (बाळया मामा) म्हात्रे, आमदार महेश चौघुले, आमदार रईस शेख, सर्व नगरसेवक, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था हयानी हिरीरिने भाग घेतला. सर्वांनी मिळुन भिवंडीला हरित भिवंडी करण्याचा संकल्प केला. एकूण ५१२ स्थानिक प्रजातींच्या वृक्षारोपण करण्यात आले. तसेच शहरातील न रस्त्याच्या दुतर्फा झाडांना खिळे, बॅनर, पोस्टर/वायर काढुन झाडे मुक्त करण्याची मोहीम राबविण्यात आली. तसेच असे कृत्य करणाऱ्या दुकाने, गॅरेज, कार्यालय यांना नोटीस देण्यात आली.

## आषाढ वारी कामांसाठी ६१ कोटी आचारसंहितेतही आयोगाची मंजुरी

■ पुणे

**आषाढी** वारीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध कामांसाठी निवडणूक आयोगाने विशेष परवानगी दिली आहे. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या कामांवर अडथळे निर्माण झाले होते. मात्र भाविकांच्या सोयीसुविधांचा विचार करून आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आषाढी वारीनिमित्त पालखी मार्गावर उभारण्यात येणाऱ्या जर्मन मंडपांसह विविध सुविधांसाठी ग्रामविकास विभागाकडून सुमारे ६१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात भाविकांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना स्वतंत्र निधी दिला जाणार आहे. वारीच्या कामांबाबत निर्णय घेण्यासाठी आचारसंहिता अडसर ठरणार नाही, यासाठी निवडणूक आयोगाने विशेष परवानगी दिली आहे. त्यामुळे आवश्यक पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापनाची कामे वेळेत पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## कुख्यात गुंड रवी बिडलन याची हत्या इमारतीच्या चेंबरमध्ये आढळला सांगाडा

■ नालासोपारा

**मागील** ५ महिन्यांपासून बेपत्ता असलेला कुख्यात गुंड रवी बिडलान याची हत्या झाली आहे. शुक्रवारी सकाळी नालासोपारा येथील एका गटाराच्या चेंबरमध्ये त्याच्या मृतदेहाचा सांगाडा आढळला आहे. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी ३ संशयितांना ताब्यात घेतले आहे. जानेवारी महिन्यातच त्याची हत्या करून मृतदेह चेंबरमध्ये टाकल्याची कबुली आरोपींनी दिली आहे.

कुख्यात गुंड रवी बिडलान (३४) हा आचोळे डोंगरी परिसरात आपल्या कुटुंबासह राहत होता. २०१२ पासून तो गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय झाला होता. परिसरात त्याची प्रचंड दहशत होती. त्याच्या विरोधात नालासोपारा, तुळींज आणि आचोळे खंडणी, दरोडा, जीवघेणा हल्ला, बलात्कार, लूटमार, शस्त्र बाळगणे छेडछाड, चोरी, मारहाण अशा दोन डझनहून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. गेल्या वर्षी त्याला ५ जिल्ह्यांतून तडीपार करण्यात आले होते. जानेवारी पासून तो बेपत्ता होता.

२६ जानेवारी रोजी रवी बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या कुटुंबियांनी आचोळे पोलीस ठाण्यात दिली होती. शुक्रवारी सकाळी आचोळे येथील वैतीवाडीतील एका इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या गटाराच्या चेंबरमध्ये एक मानवी सांगाडा स्थानिकांना आढळला होता.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मिजास मिरवणारा फळांचा राजा

यंदा अधिक महिना आल्याने फळांचा राजा असलेल्या आंब्याच्या खरेदी विक्रीला नेहमीपेक्षा जास्त प्रतिसाद मिळतो आहे. दरवर्षी केवळ महाराष्ट्रात तब्बल पाचशे कोटी रुपयांची उलाढाल या आंबा व्यापारात होते. एवढेच नव्हे तर जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राच्या हापूस आणि केशर आंब्याला मोठी मागणी असते. त्यामधूनसुद्धा वेगळे तीनशे ते चारशे कोटी रुपयांचे परकीय चलन उपलब्ध होत असते. यंदाच्या आंब्याच्या उलाढालीने नवा उच्चांक गाठला असून, महाराष्ट्रातलीच उलाढाल थेट हजार कोटीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. याची दोन कारणे प्रामुख्याने समोर येतात एक म्हणजे यंदा आलेला अधिक महिना आणि आंबा उत्पादकांनी बाजारपेठा किंवा मध्यस्थांना टाळून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा निवडलेला मार्ग त्यांना अधिक लाभ करून देणारा ठरला आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन मार्केटिंगने आंब्याला अधिक चांगले दिवस आल्याचे मानले जाते आहे. आंबा हा फळांचा राजा आहेच. परंतु आता कमी कालावधीत सर्वाधिक आर्थिक उलाढाल करण्याचा विक्रमही आंब्याकडून नोंदला जाणार आहे. परदेशामध्येसुद्धा जवळपास तेवीस हजार टन आंबा जगातल्या चाळीस देशांपर्यंत पोहोचतो. यातला आणखी एक दखल घेण्यासारखा भाग म्हणजे गेल्या काही वर्षात आंबा निर्यातीत एकट्या महाराष्ट्राचा साठ टक्के वाटा आहे. याबरोबरच संपूर्ण देशभरात आंब्याच्या शंभर ते दीडशे वेगवेगळ्या जाती उत्पादित होत असतात. यामध्ये दशहरी, तोतापुरी, मालदा, रासपरी, चौसा, लंगडा, बदामी अशा एक ना अनेक जातींची भर पडलेली आहे. भारतात उत्पादित होणारा आंबा हा जगाचेही लक्ष वेधून घेणारा ठरला असल्याने साधारणपणे जानेवारी ते जूनपर्यंत आंबा विक्री किंवा व्यापाराची मोठी उलाढाल होते. थोड्या कालावधीत काही हजार कोटींची विक्री घडून येते. काही वर्षातल्या कृषीक्षेत्रातल्या संशोधनानेसुद्धा आता आंबा लागवडीला उत्तेजन मिळालेले आहे. कमी कालावधीत फळ देणारी आंब्याची रोपं लावली जातात. आणि वर्ष-दोन वर्षातच उंचीला छोट्या असलेल्या या आंब्याच्या झाडांपासून चांगले मोठे गोड आंबे उपलब्ध होतात.

### यंदा विक्रमी विक्री

मार्च महिना आला की, हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होते. विशेष म्हणजे आता वाशी मार्केटपेक्षाही वेगवेगळ्या ठिकाणी आंब्यांची दुकानं किंवा आंबा महोत्सव भरवले जातात. आणि त्यातून मोठी मागणी निर्माण होते आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातील जवळपास पाच हजार रुपये डझन असा दणदणीत भाव हापूस आंब्याला मिळाला होता. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, देवगड या ठिकाणीदेखील मोठ्या प्रमाणावर आंब्याचा हंगाम दणदणीतपणे साजरा झालेला आहे. रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केलेल्या आंब्यांचा भाव आणि थेट झाडावरच पिकवलेल्या आंब्याला जास्त भाव मिळतो. कोकणाची हापूस आंब्यातली मक्तेदारी अजूनही कायम आहे. उत्तम दर्जाच्या आंब्याला चांगला भाव मिळतोच. त्यामध्येसुद्धा ग्रेड ठरलेली असते. बऱ्याच ठिकाणी व्यापारी आणि आंबा उत्पादक शेतकरी यांचे आधीच करार झालेले असतात. आंब्याचे संभाव्य उत्पादन लक्षात घेऊन त्या तुलनेमध्ये उत्पादकाला आगाऊ रक्कमही दिली जाते. कोकणात तर पाच पाच हजार पेटी आंबा उत्पादन करणाऱ्यांना पाच ते दहा लाखांचे ॲडव्हान्स पेमेंटही केले जात असते. या हंगामात विकल्या जाणाऱ्या आंब्यात जवळपास पंधरा टक्के आंबा हा कॅनिंगसाठी म्हणजेच आंब्यापासून बनणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांसाठी वापरला जातो. मग आंब्यापासूनचा पल्प किंवा डबाबंद रस, आंब्याचा जाम, आंबाचटणी, आंबापोळी, आंबावडी, शिवाय इतरही पदार्थ बनवून ते वर्षभर विकले जातात. विशेष म्हणजे अलिकडच्या काळात शुगर फ्री आंबादेखील उपलब्ध होऊ लागला आहे. आणि त्यालादेखील बरीच मोठी बाजारपेठ मिळते आहे. भारत तर मधुमेह म्हणजेच डायबेटिस झालेल्यांची जागतिक राजधानी होते आहे. अशा मधुमेही लोकांसाठी आंब्याची तहान भागवण्याकरीता हे शुगर फ्री आंबे वरदान ठरल्यासारखी स्थिती आहे. पूर्वी तर बाजारामध्ये विशिष्ट हंगामातच आंबा मिळत असे. परंतु आता वर्षभर आंबा उपलब्ध होतो. आणि परदेशातही पाठवला जातो. अर्थातच उत्पादित होणाऱ्या आंब्यापैकी पाच टक्के आंबा हा वाया जात असतो. ते नुकसान गृहित धरून काही ठिकाणी अशा कच्च्या आंब्यांचाही आमरसाचा स्क्वॅश तयार करण्यासाठी उपयोग होतो.

### आंबा खाणाऱ्यांची राजधानी

असे म्हटले जाते की, एकूण जगाच्या तुलनेत सत्तर टक्के आंबा भारतात पिकतो. आणि मेक्सिको पाठोपाठ भारताचा निर्यातीमध्ये नंबर लागतो. भारताचे राष्ट्रीय फळ म्हणूनही आंब्याला मान आहे. आर्थिक किंवा व्यावसायिक दृष्टीकोनाशिवाय आंब्याचे शारीरिकदृष्ट्या असलेले उपयोगही खूप महत्त्वपूर्ण असल्याने या विशिष्ट हंगामामध्ये केले जाणारे आंब्याचे सेवन हे पित्त कमी करणारे आणि कॅल्शिअम वाढवणारे असल्याचे म्हटले जाते. या काळातल्या सगळ्या भारतीय सणांमध्ये आंब्याला अग्रस्थान मिळते. वेगवेगळ्या देवळांमध्ये आंब्याची आरास करून त्या त्या ठिकाणचे भक्त आपापली श्रद्धा व्यक्त करीत असतात. धार्मिक कार्यात आंब्याची पानं सर्वाधिक शुभ मानली जातात. आणि म्हणूनच आंबादेखील शारीरिक मानसिक आणि आर्थिकदृष्ट्यासुद्धा शुभकारकच ठरत आलेला आहे. थोड्या काळासाठी का असेना परंतु फळांचा हा राजा आपली मिजास मिरवून जातो. आणि आंब्यासाठी सगळेच खवय्ये किंवा आंबाभक्त या राजाचे गुलाम होणेच पसंत करतात. भारतात आबालवृद्धांपासून सर्वांना असलेले आंब्याचे वेड हासुद्धा एक जागतिक विक्रमाचाच भाग ठरू शकतो. कारण जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात आंबा खाणाऱ्यांची सर्वाधिक संख्या आहे म्हणजे भारत ही आंबा भक्तांचीदेखील राजधानी म्हणता येते. यातून मिळणारा रोजगारही तितकाच महत्त्वपूर्ण असल्याने या आंबा बागांची किंवा आमराईची तशी वर्षभर निगा ठेवावी लागत असते. सुदैवाने यावर्षी कोकणात अवकाळी पाऊस किंवा वादळी पाऊस फारसा आलेला नाही. म्हणूनच यावेळचे आंबा उत्पादन नेहमीपेक्षा थोडे जास्त झाले आहे.

---

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

संसार सुखाचा होण्यासाठीघरात किती सुख सोयी उपलब्ध आहेत,यापेक्षा आपण एकमेकांना किती समजून घेतो हे जास्त महत्त्वाचे असते.

## पंचांग



**शनिवार, ६ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण षष्ठी**
**नक्षत्र : धनिष्ठा**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १९-०२ मकर**
**१९-०३ ते २४-०० कुंभ**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१३**

**शिवराज्याभिषेक दिन सोहळा-रायगड**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मशरूम मसाला



★ **साहित्य :** २०० ग्रॅम मशरूम, १ सिमला मिरची, ३ टेबल स्पून तेल, १ ग्रेव्हीसाठी कांदा, १ टोमॅटो, ७ ते ८ लसूण पाकळ्या, १ इंच आल्याचा तुकडा, २ ते ३ लाल सुक्या मिरच्या, ८ ते १० काजू, २ टेबलस्पून धने, १ टेबलस्पून गरम मसाला, १ टेबलस्पून तिखट, १/४ टीस्पून हळद, १ टेबलस्पून मीठ, १ टेबलस्पून कढीपत्ता पूड, ३ टेबलस्पून मलाईचे दही, २ टेबलस्पून कसुरी मेथी

★ **कृती :** ग्रेव्हीसाठी एका पॅनमध्ये एक चमचा तेल घेऊन त्यात आधी कांदा परतून घ्यावा. कांदा थोडा परतल्यावर त्यात लसूण, आलं, लाल सुक्या मिरच्या, धने, काजू घालून मिश्रण परतून घ्यावे व नंतर टोमॅटो व मीठ घालून झाकण ठेऊन चांगले शिजवावे. तयार मिश्रण थोडे थंड झाल्यावर थोडे पाणी घालून मिक्सरमधून वाटण तयार करून घेणे. एका कढईमध्ये तेल गरम करून त्यात तयार वाटण परतून घ्यावे व त्यात चिरलेली भोपळी मिरची घालून दोन ते तीन मिनिटांत शिजवावे व त्यात तिखट गरम मसाला हळद घालून मिश्रण एकजीव करावे व स्वच्छ धुतलेले मशरूमचे तुकडे घालून परतून घ्यावे. मशरूम परतून झाल्यावर त्यात सायचे दही घालून थोडं पाणी घालून एक उकळी आणावी व त्यात कढीपत्ता व कसूरी मेथी घालून मिश्रण एकजीव करून झाकण ठेवून एक वाफ आणून गरम गरम पोळी किंवा भातासोबत सर्व्ह करावे.

---

## क्रीडा



# आजपासून भारत-अफगाणिस्तान एकमेव कसोटी सुरू

## आठ वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये आमनेसामने

**न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियममध्ये उद्या सकाळपासून भारत आणि अफगाणिस्तान संघांत एकमेव कसोटी सामना सुरू होणार आहे. या सामन्यात भारतीय संघाचे पारडे जड असले तरी अफगाणिस्तानचे खेळाडू भारतीय संघाला टक्कर देण्यासाठी सज्ज झाले आहेत. हा सामना जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा भाग नाही. अलीकडे मायदेशातील कसोटी सामन्यांमध्ये भारताची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. परंतु त्यांचा संघ अजूनही मजबूत स्थितीत आहे.**



■ चंदीगड

**भारत**-अफगाणिस्तान यांच्यात आतापर्यंत फक्त एकच कसोटी सामना झालेला आहे. ही कसोटी २०१८ मध्ये बंगळुरु येथे झाली होती. या कसोटीत अजिंक्य राहणे याच्या नेतृत्वात भारतीय संघाने एक डाव आणि २६२ धावांनी विजय मिळवला. मात्र गेल्या ८ वर्षांत अफगाणिस्तानच्या संघात मोठी सुधारणा झाली आहे. कसोटीत अफगाणिस्तानने कमालीची कामगिरी करुन इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाला पाणी पाजले आहे. अफगाणिस्तानविरूद्ध उद्याच्या कसोटीत भारताचा युवा संघ उतरणार आहे. कर्णधार शुभमन गिल, ईशान किशन यांच्यासह देवदत्त पडिक्कलचाही संघात समावेश करण्यात आला. आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये पडिक्कलची कामगिरी प्रभावी ठरली होती. केवळ पडिक्कलच नाही, तर अनेक युवा खेळाडूंना या मालिकेत संधी देण्यात आली आहे. मानव सुथारला पहिल्यांदाच भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे. वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारचाही संघात समावेश करण्यात आला आहे. अफगाणिस्तानविरुद्ध हर्ष दुबे आपल्या फिरकी गोलंदाजीची जादू दाखवताना दिसेल. या कसोटीसाठी भारताच्या अंतिम ११ मध्ये साई सुदर्शन आणि देवदत्त पडिक्कल यांच्यापैकी तिसऱ्या क्रमांकावर कोण फलंदाजी करणार, हा सर्वाधिक चर्चेचा विषय होता. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी स्पष्ट केले की, साई सुदर्शन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. याचा अर्थ असा की, अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात पडिक्कल खेळणार नाही. गंभीर यांचे म्हणणे आहे की, सुदर्शनला तिसऱ्या क्रमांकावर फारशा संधी मिळत नाहीत आणि केवळ चार-पाच सामन्यांवरून त्याचे मूल्यमापन करता येणार नाही.

## रौनक, ऋषिकेश, योगेश, अजिनाथ, प्रशांत यांना स्ट्राँग मॅन किताब

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनची इक्विप गटाची राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात उत्साही वातावरणात पार पडली. सीनियर, ज्युनिअर, सब ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग अशा विविध गटात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पुरुष गटात रौनक जितेकर, ऋषिकेश तेली, योगेश गुंड, अजिनाथ शेखाडे, प्रशांत जगताप यांनी आपापल्या गटात स्ट्राँग मॅन किताबाचा मान मिळवला. तसेच महिलांमध्ये गायत्री बडेकर, शिफा शेख, प्रेरणा साळवी, डॉ. शर्वरी इनामदार, रुबी दास या स्ट्राँग वुमन किताबाच्या मानकरी ठरल्या.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे जुन्या जाणत्या पुरुष व महिला खेळाडूंना आणि क्रीडा पत्रकारांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार नवनाथ दांडेकर, माजी खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आशा नागेश पुजारी (मुंबई) आणि राष्ट्रीय पंच, आंतरराष्ट्रीय पदक विजेते, देवदत्त मनीबाई मार्तंड भोईर यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.

## फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत रशियाच्या मीरा आंद्रीवाची धडक

**पॅरिस-** फ्रेंच ओपनच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत रशियाच्या मीरा आंद्रीवाने धडक मारली आहे. आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय नोंदवला. १९ वर्षीय आंद्रीवाने युक्रेनच्या मार्टा कोस्त्युकला एक तास आणि १६ मिनिटे चाललेल्या सामन्यात ६-१, ६-३ असे पराभूत करुन पहिल्यांदाच ग्रँड स्लॅम विजेतेपदाच्या सामन्यात प्रवेश केला आहे.

## गुकेशच्या पराभवासह डी.प्रज्ञानंदचे स्थान विजेतेपदाच्या शर्यतीत बळकट

■ ओस्लो

**भारतीय** ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने डी. गुकेशवर शानदार विजय मिळवून नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या विजेतेपदाच्या शर्यतीत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. या विजयामुळे प्रज्ञानंद आता आघाडीवर असलेल्या अमेरिकेच्या वेस्ली सो पेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे, काळ्या सोंगट्यांनी खेळूनही प्रज्ञानंदने विश्वविजेता गुकेशला एका क्लासिकल गेममध्ये पराभूत करून पूर्ण तीन गुण मिळवले.

## परळमध्ये कॅरम स्पर्धा ४८ खेळाडूंमध्ये चुरस

**मुंबई** - आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुप आयोजित माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे वाढदिवस चषक १६ वर्षाखालील शालेय कॅरम स्पर्धा जिंकण्यासाठी राष्ट्रीय सबज्युनियर कॅरमपटूसह ४८ खेळाडूंमध्ये चुरस राहील. परळ येथील आरएमएमएस सभागृहात होणाऱ्या स्पर्धेत जैतापूरच्या न्यू इंग्लिश स्कूलचा आर्यन राऊत विरुध्द कार्डीनल ग्रेसियस हायस्कूलचा विराज खरात यामधील उद्घाटनीय लढत ७ जूनला दुपारी ३ वाजता सुरू होईल.

**जाहीर सूचना**

**ज्याच्याशी संबंधीत आहे त्यांच्याकरिता**

महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड (एमएलएल) याद्वारे सर्वसामान्य जनतेस सावध करते की, काही अनधिकृत व्यक्ती आणि/किंवा संस्था कंपनीचे नाव, लोगो, जीएसटीआयएन आणि पॅन यांचा गैरवापर करून कंपनीचे खोटे प्रतिनिधित्व करीत आहेत तसेच लॉजिस्टिक्स सेवा पुरविण्याच्या बहाण्याने ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी व्यवसाय मागवत आहेत.
अशा तोतया व्यक्तींकडून एमएलएलचे नाव, लोगो व ओळख वापरून बनावट कोटेशन, कन्साइनमेंट नोट्स व इतर कागदपत्रे जारी केली जात असल्याचे आढळून आले आहे आणि अनधिकृत संपर्क तपशील व वैयक्तिक/अनधिकृत बँक खाती प्रसारित करून जनतेची फसवणूक करण्याच्या उद्देशाने पैसे गोळा केले जात आहेत.
एमएलएल स्पष्टपणे जाहीर करते की, कंपनी कोणत्याही अनधिकृत ई-मेल आयडीद्वारे किंवा वैयक्तिक बँक खात्यांद्वारे कार्यरत नाही.
याद्वारे सर्वसामान्य जनतेस सावध करण्यात येते व सल्ला देण्यात येतो की, एमएलएलच्या नावाने प्राप्त होणाऱ्या कोणत्याही संदेश, पत्रव्यवहार किंवा देयकासंबंधी सूचनांवर कार्यवाही करण्यापूर्वी त्यांची पडताळणी केवळ एमएलएलच्या अधिकृत माध्यमांद्वारेच करावी आणि एमएलएलकडून आल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही अप्रमाणित अथवा संशयास्पद विनंतीच्या आधारे कोणतेही देयक अदा करू नये.
याद्वारे कळविण्यात येते की, अशा व्यक्ती किंवा संस्थांशी कोणत्याही प्रकारे जाणीवपूर्वक पत्रव्यवहार करणारी किंवा व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती तो व्यवहार पूर्णपणे स्वतःच्या जोखमीवर, खर्चावर व परिणामांची जबाबदारी स्वीकारून करीत असेल आणि अशा अज्ञात व्यक्तींशी व्यवहार केल्यामुळे किंवा त्यांनी अशा सेवा पुरविण्याबाबत अथवा इतर दावे केल्यामुळे सर्वसामान्य जनतेस होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानासाठी एमएलएल कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही.
तसेच, एमएलएलचे नाव, लोगो, ओळख किंवा इतर कोणतीही अधिकृत माहिती अथवा ओळखचिन्हे यांचा अनधिकृतपणे वापर किंवा गैरवापर करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था आढळल्यास, तिच्याविरुद्ध लागू कायद्यांनुसार फौजदारी खटल्यासह कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
संशयास्पद हालचालींची माहिती येथे द्या:
https://ethics.mahindra.com

**महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड**
**महिंद्रा टॉवर्स, पी. के. कुर्णे चौक,**
**वरळी, मुंबई - ४०००१८**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that my client is intending to purchase Five Shares duly represented by the shares certificate No. 174 with Distinctive shares Nos. 571 to 575 along with Flat No. B/603 in Society known as The **Gulshan Villa Premises Cooperative Society Ltd.** situated at **Juhu Cross Road, Off Barfiwala Marg, Andheri West, Mumbai - 400 058.** Admeasuring about 980 Sq. Ft. super built up area more particularly described in the schedule hereunder written from MRS. CHARVI STAVAN SHAH Any person(s) having any claim(s) in the said flat by way of any right, title or interest, agreement, Joint Venture possession, Trust, lease lien and charge are hereby requested to make the same known in writing with documentary proof to the undersigned at the address mentioned below within 14 days from the date hereof. Otherwise, such claim(s) if any will be considered as waived and abandoned and transaction will be completed.

**"THE SCHEDULE ABOVE REFERRED TO"**

Five Shares duly represented by the shares certificate No. 174 with having Distinctive shares Nos. 571 to 575 of Flat No. B/603 having Flat admeasuring about 980 Sq. Ft. super built up area in "Gulshan Villa Premises Co-operative Society Ltd," situated at Juhu Cross Road, Off Barfiwala Marg, Andheri West, Mumbai - 400058.

**M/S. BABULAL DIYORA & CO.**
Chartered Accountants 105, Aman Chambers, Opera House, Mumbai – 400 004.
Place:Mumbai Date:06/06/2026

**PUBLIC NOTICE**

To know you all by this Public Notice, I hereby inform you that the property land bearing Survey No. 104/5, area admeasuring 10.00.00 R.Sq.Mtrs., assessed at Rs. 100.00 Ps., lying and being situated in the revenue village Majivali, Taluka Vasai, District Palghar is in the name of M/s. JSB Homemakers Private Limited. My client is willing to Purchase the above mentioned land, hence by this Public Notice I hereby invite objections of any person/institute/firm/company who is/are having interest in the said property by way of Gift, Agreement, Conveyance, Development Rights, Easmentary rights, possession, tenancy or any type of right. I hereby declare that any person/institute/firm/company having interest in the said property should forward his/her/their objection in writing along with the relevant documents to the below mentioned address within 15 days from publication of this Public notice failing which we shall hold and presume that there is no claim of any type and if any such rights or claims exist are deemed to have been waived and no objection shall be considered. Please note.

**Sd/-**
**Advocate Anish Kalvert**
Shop No. 1, Sahayog CHSL, Near Kalimata Mandir, Diwanman, Vasai (W), Tal. Vasai, Dist. Palghar - 401202.
Vasai Date: 06.06.2026

**ई-लिलाव विक्री सूचना**

(आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि ३३ अन्वये)
**युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये) ('यूआयएल')**
(सीआयएनः L99999MH1997PLC107153)
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये विक्री)

यूआयएलचे परिसमापक याद्वारे पात्र बोलीदारांकडून याखाली सूचिबद्ध केलेल्या यूआयएलच्या मालमत्तेच्या **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे काही आहे तत्त्वावर"**, आणि **"कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** आणि प्रक्रिया दस्तऐवजामध्ये सूचिबद्ध शर्ती आणि प्रक्रियेनुसार ई-लिलाव विक्रीमध्ये सहभागी होण्याकरिता आमंत्रित करीत आहेत.

| लॉट | मालमत्तेचे तपशील | राखीव किंमत (भारतीय रुपये) | इसारा रक्कम अनामत (भारतीय रुपये) | बोली विस्तार मूल्य (भारतीय रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | मोलेम येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | १,३०९,१६० | १३०,९१६ | २६,४०० |
| २. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | २५६,८४५ | २५,६८५ | ६,१०० |
| ३. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | ९५३,३८१ | ९५,३३८ | १९,२०० |
| ४. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | ८४३,९५९ | ८४,३९६ | १७,२०० |
| ५. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | १,०८०,००० | १०८,००० | २१,६०० |
| ६. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | १,२००,००० | १२०,००० | २४,००० |
| ७. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | १,२४९,०२० | १२४,९०२ | २५,००० |
| ८. | नागोठणे येथे असलेली वाहने आणि यंत्रसामग्री | १,०५७,२५५ | १०५,७२६ | २१,४०० |

टीपः मालमत्तेचे तपशील https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home / https://www.unityinfra.com येथे उपलब्ध ई-लिलाव प्रक्रिया ज्ञापनामध्ये देण्यात आला आहे. प्रक्रिया ज्ञापनामध्ये उल्लेखिलेली मालमत्ता लॉटनुसार विक्री करण्यात येईल. बोलीदार इसारा रक्कम अनामत जमा करून संपूर्ण लॉटकरिता बोली लावू शकतात. वरील विक्री वेबसाईटः https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home / https://www.unityinfra.com वर अपलोड केलेल्या प्रक्रिया दस्तऐवजामध्ये उल्लेखिलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन आहे. कृपया तपशिलाकरिता ते पहावे.
**बोली सादरीकरणाकरिता अंतिम दिनांकः दि. १ जुलै, २०२६**
**ईएमडी सादरीकरणाकरिता अंतिम दिनांकः दि. १ जुलै, २०२६**
**ई-लिलाव दिनांकः दि. ४ जुलै, २०२६**
**ई-लिलावाचा वेळः स. ११.०० पासून**
**संपर्कः ०२२-६६२६१६००**
**पत्रव्यवहाराचा ईमेलः liqunity@dsaca.co.in, aks@dsaca.co.in**

**आलोक कैलाश सक्सेना**
परिसमापक - युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड
**नोंद. क्र.:** IBBI/IPA-001/IP- P00056/2017-18/10134
**कार्यालयाचा पत्ताः** पहिला मजला, लक्ष्मी इमारत, सर फिरोझशाह मेहता रोड, मुंबई, महाराष्ट्र - ४००००१.
**दिनांकः** ०५.०६.२०२६

**आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए सह वाचावयाच्या आयबीसी संकेत, २०१६ अन्वये एनआरआरएचे अभिहस्तांकन हाती घेण्याच्या प्रस्तावाकरिता (सुरुवातीचे) आमंत्रण**

**मे. टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
**सीआयएनः U70103MH2012PTC231662**

**टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक याद्वारे तात्काळ वसूल न करता येणाऱ्या मालमत्ता (एनआरआरए)च्या अभिहस्तांकनाकरिता इच्छुक व्यक्ती(क्तीं)कडून प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.**
आयबीबीआय परिसमापन प्रक्रिया विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए (आयबीसी, २०१६ च्या कक्षेमध्ये) अन्वये टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या तात्काळ वसूल न करता येणाऱ्या मालमत्तांच्या {असहकार कलम १९(२) आणि माननीय एनसीएलटीकडे दाखल केलेल्या टाळण्याच्या अर्जांमध्ये अंतर्निहित मालमत्ता, ज्या तात्काळ वसूल न करता येणाऱ्या मालमत्ता म्हणून विचारात घेण्यात येत आहेत.} **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** अभिहस्तांकन/हस्तांतरणाकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.
अभिहस्तांकन/हस्तांतरण आयबीसी, २०१६ च्या तरतुदी, त्याअंतर्गत बनलेल्या विनियमन आणि प्रक्रिया माहिती दस्तऐवजांच्या अधीन असेल.

| अभिहस्तांकन करावयाच्या मालमत्तांचे वर्णन | |
|---|---|
| १. | आयए३३४९/२०२४ - असहकार अर्ज |
| २. | आयए३४३८/२०२५ - टाळण्याच्या अर्जामध्ये अंतर्निहित मालमत्ता |

वरील अभिहस्तांकन निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** करण्यात येईल.
अभिहस्तांकन भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए सहवाचावयाच्या नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदी आणि तपशिलवार प्रक्रिया माहिती दस्तऐवजांच्या तरतुदींच्या अधीन असेल.
इच्छुक सहभागी " **टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या एनआरआरएमध्ये इच्छुक**" असा विषय असलेला **ईमेल irp.taquitolease@gmail.com येथे** पाठवून उपलब्ध होणाऱ्या दस्तऐवजांची पाहणी करू शकतात.
प्राप्त प्रस्तावांचे पुनरावलोकन केल्यानंतर आणि भागधारकांच्या सल्लागार समितीशी चर्चा करून, परिसमापक पुढील प्रक्रिया, अटी व शर्ती इत्यादींबाबत निर्णय घेतील. कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता, प्राप्त झालेले सर्व किंवा कोणतेही प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार परिसमापकांनी राखून ठेवले आहेत.
**टीपः**
- लागू जीएसटी अतिरिक्त
- सर्व गुंतवणुकदारांनी, कंपनीच्या प्रस्तावित तात्काळ वसूल न करता येणाऱ्या मालमत्तांचे अभिहस्तांकन किंवा हस्तांतरणाकरिता केले जाणार आहे, त्यासंबंधीच्या आपल्या ऑफर/प्रस्तावाच्या सादरीकरणासोबत किंवा त्यापूर्वी, ज्या मालमत्तेकरिता प्रस्ताव देण्यात येत आहे, त्याच्या प्रस्तावित रकमेच्या १०% एवढी रक्कम ईएमडी/इसारा रक्कम **मे. टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड** - परिसमापनामध्ये च्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरणाद्वारे जमा करणे आवश्यक आहे.

• द्वारा पारित
हस्ती मल कच्छरा
टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) चे परिसमापक
आयपी नोंद. क्र. IBBI/IPA-002/IP-N00342/2017-2018/10992
पत्ताः ए-६०२, निर्माण अपार्टमेन्ट्स, पंप हाऊस, विकास नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००९३.
दूरध्वनीः +९१ ९८६७५ ५७६६०, ईमेलः irp.taquitolease@gmail.com

# आसारामला नियमित उपचार द्या उच्च न्यायालयाचे प्रशासनाला निर्देश

■ जयपूर



**अल्पवयीन** मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूच्या ढासळत्या प्रकृतीबाबत राजस्थान उच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. त्याच्यावर नियमित उपचार आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला सुनिश्चित करावा आणि त्यांचे वय आणि प्रकृती लक्षात घेता, त्याच्या उपचारात कोणताही अडथळा येऊ नये, स्पष्ट आदेश न्यायालयाने तुरुंग प्रशासनालाला दिले आहेत. आसारामने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, आसाराम याच्यावर केवळ प्राथमिक नव्हे, तर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार व्हावेत. त्याच्या प्रकृतीची नियमित वैद्यकीय तपासणी करून अहवाल सादर त्याच्या वाढत्या वयानुसार आणि आजारपणामुळे त्यांना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा पुरवण्यात याव्यात. आसाराम गेल्या काही काळापासून हृदयविकार आणि वयोमानपरत्वे उद्भवणाऱ्या इतर गंभीर आजारांनी त्रस्त आहे.

# 'सनबर्न'ची १० लाखांची सुरक्षा ठेव जप्त करणार

**राष्ट्रीय हरित लवादाचा निर्णय**

**पणजी- गोवा** सनबर्न फेस्टिव्हलच्या आयोजकांवर ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोठी कारवाई झाली आहे. गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने जप्त केलेली १० लाख रुपयांची सुरक्षा ठेव जप्त करण्याचा निर्णय राष्ट्रीय हरित लवादाच्या पश्चिम न्यायपीठाने कायम ठेवला आहे. न्या. दिनेश कुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. सुजित कुमार बाजपेयी यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने कार्यक्रमाच्या ठिकाणी आवाजाची पातळी मोजण्यासाठी घेतलेले नमुने पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम ११ नुसार कायदेशीररीत्या घेतले नव्हते. तसेच या पर्यटन परिसरात असलेल्या इतर व्यावसायिक उपक्रमांमुळे आणि हॉटेल्समुळे आवाजाची पातळी वाढली असावी, असा तांत्रिक युक्तिवाद आयोजकांच्या वतीने करण्यात आला होता. दरम्यान, यापूर्वीच गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान आयोजकांचा हा तांत्रिक युक्तिवाद फेटाळला होता.

देश विदेश

# उत्तर कोरियात अणुबॉम्ब इंधन निर्मिती प्रकल्पाचे अनावरण



■ प्योंगयांग

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**उत्तर** कोरियाने अणुबॉम्बसाठी इंधन निर्मिती करणाऱ्या एका नवीन प्रकल्पाचे अनावरण केले. या प्रकल्पाला भेट दिल्यानंतर उत्तर कोरियाचे सर्वोच्च नेते किम जोंग उन यांनी देशाची आण्विक शक्ती वाढवणार असल्याचे जाहीर केले. दक्षिण कोरियाच्या लष्कराने (जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ) या जागेचे युरेनियम संवर्धन प्रकल्प म्हणून मूल्यांकन केले असून, उत्तर कोरियाच्या या आण्विक हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ते अमेरिकेशी जवळून समन्वय साधत आहेत. उत्तर कोरियाच्या अधिकृत 'कोरियन सेंट्रल न्यूज एजेन्सी'ने प्रसिद्ध केलेल्या छायाचित्रांमध्ये, किम जोंग उन चांदीच्या नळ्या आणि सेंट्रीफ्यूजच्या दाट रांगांनी भरलेल्या एका मोठ्या हॉलमधून चालताना दिसत आहेत. शस्त्रास्त्रांसाठी वापरल्या जाणाऱ्या युरेनियमच्या संवर्धनासाठी या सेंट्रीफ्यूजची आवश्यकता असते. किम यांनी दावा केला आहे की, पाच वर्षांपूर्वीच्या तुलनेत उत्तर कोरियाची शस्त्रास्त्र-दर्जाच्या आण्विक सामग्रीची उत्पादन क्षमता आता दुप्पट झाली आहे. २०१९ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबतची राजनैतिक चर्चा अयशस्वी झाल्यापासून उत्तर कोरियाने आपल्या अण्वस्त्रांचे भांडार वाढवण्यावर आणि त्याच्या आधुनिकीकरणावर पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे.

# प्रकल्प रखडवणाऱ्या कंत्राटदारांना नवी कामे नाहीत! मुख्यमंत्र्यांचे निर्देश

■ मुंबई

**सरकारी** पायाभूत सुविधा प्रकल्प वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील कोणतीही नवी कामे देऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. प्रकल्प ठरलेल्या मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असून, संबंधित यंत्रणांनी याकडे काटेकोर लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित 'मुख्यमंत्री वॉर रूम' बैठकीत राज्यातील विविध प्रकल्पांचा आढावा घेताना ते बोलत होते. प्रकल्प पूर्ण करण्यात होणारा विलंब कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास, गोरेगाव-मुलुंड दुहेरी बोगदा प्रकल्प (जानेवारी २०२९ पर्यंत पूर्ण), तसेच वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू आणि विरार-अलिबाग मल्टीमॉडेल कॉरिडोर यांना गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. भूसंपादन प्रक्रिया जलद करण्याचेही निर्देश देण्यात आले. याशिवाय विविध मेट्रो प्रकल्प आणि शिवडी-वरळी उन्नत मार्ग यांचाही आढावा घेण्यात आला. धारावी पुनर्विकास प्रकल्पात उद्योजकांना एसजीएसटी सवलत देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देत, तेथील अर्थव्यवस्थेला चालना देण्यावर भर देण्यात आला.

# निवडणूक खर्चाचा हिशेब दिला नाही ७ उमेदवार तीन वर्षांसाठी अपात्र

**कोकण विभागीय आयुक्तांचे आदेश**

■ विरार

**महापालिका** निवडणूक काळात खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या ७ उमेदवारांना पुढील ३ वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास तसेच महापालिकेचा सदस्य बनण्यासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. कोकण विभागीय आयुक्तांनी या संदर्भातील आदेश काढले आहेत.

जानेवारी महिन्यात वसई-विरार शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. एकूण ५४७ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व कायदेशीर तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने विहित मुदतीत आपल्या निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करणे बंधनकारक आहे. मात्र ७ उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर केलेला नव्हता. या ७ उमेदवारांना अनर्हत घोषित करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी ३ वेळा सुनावणीदेखील आयोजित करण्यात आली होती. मात्र ते अनुपस्थित राहिले. परिणामी, सदर उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कायदेशीर आदेशांचे व तरतुदींचे उल्लंघन केल्याने त्यांना महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यास व महानगरपालिकेचा सदस्य होण्यास अनर्हत घोषित करण्यात आल्याचे आदेश विभागीय कोकण आयुक्तांनी काढले आहेत. अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये जोसेफ वर्गीस, सुषमा पांडे, विशाल जाधव, राकेश कांबळे, मोहम्मद खान, कांचन यादव आणि शाहिद शेख या ७ जणांचा समावेश आहे.

# सोलापुरात वसंतनाना देशमुखांच्या उमेदवारीवरून मविआत फूट

■ सोलापूर

**सोलापूर** विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीमध्ये मोठी फूट पडल्याचे चित्र समोर आले आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतनाना देशमुख यांच्या उमेदवारीवरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. उत्तम जानकर यांनी मोहिते-पाटील यांच्यावर थेट निशाणा साधत वसंतनाना देशमुख यांचे नाव पुढे करून मोहिते-पाटलांनी आमचा केसाने गळा कापला आहे, असा गंभीर आरोप केला. ते म्हणाले की, ज्या व्यक्तीला साधी जिल्हा परिषदेची जागा निवडून आणता येत नाही, अशा उमेदवाराला विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात आल्याने निवडणूक भाजपासाठी सोपी करण्यात आली. शरद पवार गटातील अनेक प्रमुख नेते या उमेदवारीबाबत नाराज आहेत.

# मराठा आंदोलनातील ३४ मृतांच्या वारसाला १० लाख रुपये मंजूर

पान १ वरून

यांच्याशी चर्चा करून उर्वरित कुटुंबांना तातडीने मदत देण्याचे आश्वासन दिले होते. आज ते पूर्ण झाले. सरकारने मागील दोन दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करून ३४ मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपये मंजूर केले आहेत. या निर्णयामुळे संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, मदत मिळणाऱ्या वारसदारांमध्ये बीड जिल्ह्यातील १५, धाराशिवमधील ५, परभणीतील ४, हिंगोलीतील ४, नांदेडमधील ३, जालन्यातील १, छत्रपती संभाजीनगरमधील १ आणि लातूरमधील १ वारसदाराचा समावेश आहे.

**ओबीसींप्रमाणे मराठा समाजाला शैक्षणिक सवलतीही लागू**

ओबीसी समाजाप्रमाणे मराठा समाजाला शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्याचा निर्णयही आज सरकारने घेतला. या निर्णयानुसार मराठा समाजासाठी तब्बल ८ विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना, मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींबाबतची प्रतिपूर्ती करण्याबाबतची योजना, महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे व परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी लागू असलेली योजना, ओबीसी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेले सर्व अभ्यासक्रम यासाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी पात्र असतील. केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांवर, प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलतीही लागू करण्यात येणार आहेत.

# कागदोपत्री पुरावे नेहमीच श्रेष्ठ खोलीसाठी ११ वर्षांचा लढा यशस्वी

**घराचा ताबा परत देण्याचे आदेश**

■ मुंबई

**वांद्रे** पूर्वेकडील टॅक्सी ड्रायव्हरच्या हक्काच्या खोलीवर जबरदस्तीने कब्जा करणाऱ्या शेजाऱ्याला दिंडोशी दिवाणी न्यायालयाने मोठा दणका दिला. तोंडी दाव्यांपेक्षा सरकारी कागदोपत्री पुरावे नेहमीच श्रेष्ठ ठरतात, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत न्यायालयाने पीडित कुटुंबाला त्यांच्या हक्काच्या घराचा ताबा परत देण्याचे आदेश दिले. ११ वर्षे चाललेल्या या कायदेशीर लढ्यानंतर अखेर पीडित टॅक्सी ड्रायव्हरच्या कुटुंबाला न्याय मिळाला. वांद्रे पूर्व येथील संत ज्ञानेश्वर नगरमधील 'रुम नंबर २४' ही खोली मृत टॅक्सी ड्रायव्हर गोलिवाडा नरसय्या यांनी १९९० मध्ये मोहम्मद कासिम यांच्याकडून ९० हजार रुपयांना विकत घेतली होती. २००५ च्या महापुरात व्यवहाराची मूळ कागदपत्रे वाहून गेली आणि खराब झाली. मात्र, या पत्त्यावर कुटुंबाचे आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, बँक पासबुक आणि वीज बिल सुरू होते. ६ मे २०१५ रोजी गोलिवाडा हे आजारी मुलावर उपचार करण्यासाठी रुग्णालयात व्यस्त असताना शेजारी राहणाऱ्या मोहम्मद दस्तीगीर याने गोलिवाडा यांच्या खोलीचे कुलूप तोडून आतल्या वस्तू फेकून दिल्या.

# कोल्हापूर-हैदराबाद विमान निम्म्या वाटेतून परतले

**कोल्हापूर** - कोल्हापूरहून हैदराबादकडे निघालेले इंडिगो एअरलाईन्सचे विमान गुरुवारी तांत्रिक बिघाडामुळे निम्म्या वाटेतून परत आले. मात्र, खराब हवामानामुळे विमान कोल्हापूरला परत आणल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice (2nd Call)**

Maharashtra State Electricity Transmission Company Ltd, EHV PC O&M Zone Vashi invites bids through SRM e-Tender in two bid system (Techno-commercial Bid & Price Bid) from the eligible registered bidders for following works;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000040033 | T-05/ 2026-27 (2nd Call) | Replacement of existing Battery Sets & Battery Chargers by New Battery Sets & Battery Chargers in various Substations under EHV O&M Division Bhandup including buyback of replaced Battery Sets and Chargers. | Rs. 143.60 Lakhs (incl. GST) | Rs. 1,43,602.41 | Rs. 5900/- |

**Sale period :** 05.06.2026 to 15.06.2026, **Last Date of Submission:** 15.06.2026 up to 15:00 Hrs,
**Date of opening (Tech. bid):** 15.06.2026 at 15:30 Hrs (if possible).
**Contact person:** Executive Engineer, EHV PC O&M Zone, Vashi.
Phone No. (022) 27666010 (P) / 27665994.
For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

Sd/-
Chief Engineer,
EHV PC (O&M), Zone, MSETCL, Vashi



"Anjuman E Nurul Islam Trust"
Anjuman Noorul Islam Urdu High School
(Pvt Govt, Minority Aided)
Tilak Nagar Sakinaka
Mumbai -72

**REQUIRED**
**02 Teachers For Urdu Med**
(HSC D.ED 1st TET/ C-TET Pass for V STD)
(The appointment will be as a Shikshan Sevak for 3 years as per government rules)

**Walk In - Interview**
**Saturday, 13 June 2026.**
**Time 11.00 AM**

Note: - Candidate must have passed SSC Marathi subject with 100 Marks. The appointment is subject to the approval from the Education Inspector North Zone.



**मालमत्तेचा प्रस्तावित पुनर्विकास**

दादर-नायगाव विभागातील सी. एस. क्र.८०, इमारत क्र.१४, वॉर्ड क्र.एफएस-५२२(५एए)१४, संत गाडगे बाबा मार्ग, दादासाहेब फाळके रोडला लागून, दादर-पूर्व, मुंबई - ४०० ०१४.
धून इमारत म्हणून ज्ञात

| अ.क्र. | दुकान/ खोली क्र. | भाडेकरुंची नावे | रहिवाशांची नावे |
|---|---|---|---|
| **तळमजला** | | | |
| १. | १ | अंजू भरत मेहता आणि संगीत भरत मेहता | अंजू भरत मेहता आणि संगीत भरत मेहता |
| २. | ४ए | अमिश कुंवरजी मामानिया | अमिश कुंवरजी मामानिया |
| ३. | ४ | होशंग अस्पी सुरती | होशंग अस्पी सुरती |
| ४. | ४बी | रेखा दिनेश सुराणा | रेखा दिनेश सुराणा |
| **पहिला मजला** | | | |
| ५. | २ | दक्षा दीपेन रांभिया आणि जश दीपेन रांभिया | दक्षा दीपेन रांभिया आणि जश दीपेन रांभिया |
| ६. | २ए | स्मित ऑईल मिल्स प्रा. लि. | स्मित ऑईल मिल्स प्रा. लि.चे संचालक मेघजी रायशी रांभिया आणि दीपेन मेघजी रांभिया |
| ७. | ५ | राजश्री जयेश व्होरा आणि जयेश भानजी व्होरा | राजश्री जयेश व्होरा आणि जयेश भानजी व्होरा |
| **दुसरा मजला** | | | |
| ८. | ३ | जयेश व्होरा आणि राजश्री जयेश व्होरा | जयेश व्होरा आणि राजश्री जयेश व्होरा |
| ९. | ६ए | कुणाल किरण कोठारी आणि मोह. अफान मोह. आरिफ तन्वर | कुणाल किरण कोठारी आणि मोह. अफान मोह. आरिफ तन्वर |
| १०. | ६ | हितेन किरण कोठारी | हितेन किरण कोठारी |
| **तिसरा मजला** | | | |
| ११. | ७ | मोह. अदनान मोह.आरिफ तन्वर | मोहम्मद. अदनान मोहम्मद. आरिफ तन्वर |
| १२. | ८ | दत्तात्रय आत्माराम अदाते | दत्तात्रय आत्माराम अदाते |

वरील नमूद इमारतीतील भाडेहक्कासंदर्भात वरील नमूद व्यक्तींव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचा/पक्षाचा कोणताही हक्क असल्यास, त्यांनी त्यांच्या कथित भाडेहक्काच्या समर्थनार्थ ठोस पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर या सूचनेच्या प्रकाशनापासून सात (७) दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा, करण्यात आलेले कोणतेही दावे ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

१. कार्यकारी अभियंता, एफ एस विभाग, एम.बी.आर. अँड आर. बोर्ड, सनशाईन प्लाझा, २रा मजला, एम.एम.जी.एस. मार्ग, दादर (पूर्व), मुंबई – ४०००१४.
२. मे. लोटस डेव्हलपर्स, बाबू इमारत, २रा मजला, ३७५/३७७, लॅमिंग्टन रोड, ग्रँट रोड (पूर्व), मुंबई – ४००००७.

वरील नमूद कालावधी संपल्यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही. (विकासकामार्फत प्रसिद्ध)


# मनीषा वाघमारेच्या जामिनाचा निर्णय न्यायालयाने राखून ठेवला

■ नवी दिल्ली

**देशभरात** गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या मनीषा वाघमारेच्या जामीन अर्जावर दिल्लीतील राऊज एव्हेन्यू न्यायालयाने निर्णय राखून ठेवला असून, ९ जून रोजी निकाल दिला जाणार आहे.

आज झालेल्या सुनावणीत न्या. अजय गुप्ता यांनी आरोपीच्या वकिलांना तपास सुरू असताना इतक्या घाईने जामीन अर्ज का दाखल केला, असा सवाल उपस्थित केला. यावर बचाव पक्षाने केंद्रीय अन्वेषण विभागाला (सीबीआय) आतापर्यंत कोणताही ठोस पुरावा सापडलेला नसल्याचा दावा केला. वाघमारे या शिक्षण समुपदेशक असून, त्यांना नियमित उत्पन्न असल्याचे वकिलांनी सांगितले. सीबीआयने उल्लेख केलेले ३.५० लाख रुपये त्यांच्या पूर्वजांच्या मालमत्तेतून भेट मिळाल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. त्यांच्या घरावर दोनदा झडती टाकून कोणतीही रोख रक्कम जप्त झालेली नसल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, वाघमारे या 'व्हर्टिगो' (गरगरणे) आजाराने त्रस्त असल्याचा मुद्दा मांडत त्यांना जामीन देण्याची मागणी केली.

## 'समृद्धी'वर अपघात! चिमुरड्याचा जागीच मृत्यू

**नागपूर** - नाशिक - समृद्धी महामार्गावरील अपघातांची मालिका सुरूच असून नागपूर लेनवरील चेनेज क्रमांक ६३१ जवळ ट्रॅव्हल्स गाडीचा अपघात झाला. या दुर्घटनेत एका लहान मुलाचा जागीच मृत्यू झाला, तर नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. ट्रॅव्हल्स गाडी नागपूरच्या दिशेने जात असताना हा अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की, वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.


इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेजरींग इंस्ट्रुमेंट्स
**एम एस एम ई - टेक्नॉलॉजी सेंटर, मुंबई**
सूक्ष्म, लघु और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
IDEMI

**प्रवेश सुरु शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पात्रता १० वी पास**

AICTE & MSBTE - मान्यताप्राप्त ३ वर्षीय डिप्लोमा कोर्सेस

**डिप्लोमा इन टुल एंड डाई मेकींग (Mechanical)**
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत टुल डीझाईन आणि टुल निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते.
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 8976300878 / 7021221498

**डिप्लोमा इन ३डी एनिमेशन एंड ग्राफीक्स**
इंफोरमेशन टेक्नोलोजी (IT) इंजीनीयरींग (MSBTE EQUIVALENCE)
हॅन्ड्स ऑन प्रॅक्टिकल ट्रैनिंग ग्राफिक्स डिझाईन, एडिटिंग, ॲनिमेशन, गेम इंजिन, स्पेशल इफेक्ट्स,फिल्म कम्पोझिटिंग, एडिटिंग आणि UX / UI Design, AR / VR Game Design, Generative AI
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9821473895 / 8291437525

**डिप्लोमा इन रोबोटीक्स एंड मेकेट्रोनिक्स**
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत मेकाट्रोनिक्स, रोबोटीक्स, ऑटोमेशन आणि एम्बेडेड सिस्टम्स, डिझाईन एड डेव्हलपमेंट प्रशिक्षण दिले जाते.
अधिक माहीती साठी संपर्क साधा :9819495547 / 9833292670

TUITION FEE FREE मोफत प्रशिक्षण SC/ST

आधिक माहीती साठी क्युआर कोड स्कॅन करा

रजीस्ट्रेशन लिंक https://idemi.org/training/aicte
आयडीईएमआय, इस्टर्न् एक्सप्रेस हायवे, चुन्नाभटी सायन, मुंबई
फोन.: ०२२ २४०५०३०९/२/३/४ EXT.No. २१३ / Email: training@idemi.org / Website: www.idemi.org



purple FINANCE

**कार्यालय:** पर्पल फायनान्स लि., ७०५/७०६, ७वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५१.
**दूर.:** ०२२-६९१६५१२३, **वेबसाईट:** www.purplefinance.in

**विक्री सह लिलाव सूचना**

**शाखा:** विरार

आम्ही दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये अ. क्र. १ मध्ये उल्लेखित कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार यांना विक्री सूचना पारित करीत असून, त्याद्वारे त्यांना खाली उल्लेखिल्यानुसार दायित्वे सदर दिनांकापासून ३० दिवसांच्या आत फेडण्याचा सल्ला देत आहोत, असे न केल्यास खालील वर्णनामध्ये उल्लेखिलेली तारण मालमत्ता देण्यांच्या वसुलीकरिता खाली उल्लेखिलेल्या दिनांकास, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या नियम ८ च्या उप नियम ६ च्या कलम १३(४) च्या तरतुदींअंतर्गत विक्री करण्यात येतील. तसेच सदर कायद्याअंतर्गत अ. क्र. १ मध्ये उल्लेखित कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार यांना लिलाव सूचना देखील देण्यात येत आहे.

| कर्ज खाते क्र. | स्थावर मालमत्तेचा तपशील | दि. ०३.०६.२०२६ रोजी नुसार एकूण थकबाकी देणी रु.मध्ये | मालमत्तेचा पाहणी दिनांक |
|---|---|---|---|
| कर्जदार/सह-कर्जदाराचे नाव | ताब्याचा दिनांक | राखीव किंमत आणि इसारा रक्कम अनामत (ईएमडी) रक्कम रु.मध्ये | लिलाव दिनांक आणि वेळ |
| PFLSLVIR0000116 | गाव-पाटगाव, तालुका मुरबाड आणि जिल्हा ठाणे - ४२१४०१ येथे वसलेले असलेले आणि स्थित घर क्र. ९१८, मोजमाप ९६० चौ.फू. म्हणजेच ८९.१९ चौ.मी. **चतुःसीमाः** **पूर्व**- श्री. महादू बनसोडे यांचे घर, **पश्चिम**- समाज हॉल, **दक्षिण** - खुली जागा, **उत्तर**- श्री. जनार्दन बनसोडे यांचे घर | रु. ७६९३९६/- | दि. १५.०६.२०२६ |
| १. दीपक दशरथ बनसोडे (कर्जदार) २. दिपाली दीपक बनसोडे (सह-कर्जदार) | दि. २८.०४.२०२६ | रु. ९९४६८०/- आणि रु. ९९४६८/- | दि. ०५.०७.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत |

**लिलावाचे ठिकाणः** पर्पल फायनान्स लिमिटेड कॉसमॉस स्वेअर प्रिमायसेस, दुकान क्र. एफ३२, १ला मजला, चिखल डोंगरी रोड, ग्लोबल सिटी विरार पश्चिम ४०१३०३ (गणेश पाखरे - ९८२१७१२९२९)

**अटी आणि शर्तीः (१)** लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक बोलीदारांनी "पर्पल फायनान्स लिमिटेड" च्या नावे डिमांड ड्राफ्ट द्वारे अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. **(२)** यशस्वी बोलीदाराला, विक्री त्याच्या/तिच्या बाजूने निश्चित झाल्यानंतर, आधी जमा केलेली अनामत रक्कम वगळून बोली रकमेच्या १०% रक्कम त्वरित भरावी लागेल आणि उर्वरित विक्री किंमत विक्रीची सूचना मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत जमा करावी लागेल. **(३)** जर यशस्वी बोलीदाराने पैसे भरण्यात कसूर केल्यास किंवा विक्रीच्या अटींचे पालन करण्यात अपयश आल्यास, आधी जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि अशा जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही हक्क राहणार नाही. **(४)** जर कोणत्याही कारणास्तव, सार्वजनिक लिलावाच्या दिवशी राखीव किंमत प्राप्त झाली नाही, तर संबंधित मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी त्यानंतरच्या सोयीस्कर तारखेला कर्जदार, सह-कर्जदार, हमीदार आणि सामान्य जनतेला कोणतीही अतिरिक्त सूचना न देता निविदा किंवा खाजगी करार मागवण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्याकडे राखीव राहील. **(५)** ही विक्री "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" केली जाईल, इच्छुक व्यक्तींनी मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत आणि मालमत्तेवर परिणाम करणाऱ्या सरकारी/निम-सरकारी विभागांच्या कोणत्याही दाव्यांबाबत/देण्यांबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. या मालमत्तांवर देय असलेली कोणतीही वैधानिक किंवा इतर देणी केवळ खरेदीदार/बोलीदारांनाच भरावी लागतील. मालमत्ता हस्तांतरित करण्यासाठी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, हस्तांतरण शुल्क इत्यादींसह कोणत्याही स्वरूपाचा सर्व खर्च केवळ खरेदीदारालाच करावा लागेल आणि कंपनी यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. **(६)** अधिकृत अधिकाऱ्यांनी कोणत्याही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे, तसेच, कोणत्याही सूचनेशिवाय या जाहिरातीच्या/विक्रीच्या अटी व शर्तींमध्ये बदल (समावेश किंवा वगळणे) करण्याचा अधिकारही त्यांच्या विवेकाधीन राहील. **(७)** इच्छुक बोलीदार इसारा अनामत रक्कम जमा केल्यानंतर, लिलावाच्या तारखेपूर्वी कार्यालयीन वेळेत कंपनीकडे असलेल्या मालमत्तेच्या कागदपत्रांच्या प्रतींची पडताळणी करू शकतात. **(८)** कृपया लक्षात घ्या की, वर वर्णन केलेली मालमत्ता विक्रीसाठीचा हा "प्रस्ताव" नाही, तर लिलाव/बोली प्रक्रियेत सहभागी होऊन खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यासाठी जनतेला दिलेले केवळ एक निमंत्रण आहे.

सही/-
**दिनांकः** ०६.०६.२०२६
**ठिकाणः** विरार
**अधिकृत अधिकारी,**
**पर्पल फायनान्स लि.करिता**

मुंबई । शनिवार
६ जून, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in





## हिना खानचा सूचक संदेश

**अभिनेत्री** शिल्पा शिंदे हिच्याशी संबंधित सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, अभिनेत्री हिना खान हिने समाजमाध्यमांवर एक सूचक आणि तीव्र शब्दांतील संदेश (क्रिप्टिक नोट) प्रसारित केला आहे, ज्याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. भारताचे माननीय पंतप्रधान, माननीय राष्ट्रपती आणि कायदा मंत्री यांना उद्देशून लिहिलेल्या या संदेशात तिने म्हटले आहे की, गुन्हा केल्यानंतर तो कबूल करणाऱ्या सर्व गुन्हेगारांची कृपया सुटका करण्यात यावी. कारण त्यांच्याकडे तसे करण्याचे धैर्य असते, ते लढवय्ये असतात, ते सत्याच्या बाजूने उभे राहतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी जेव्हा हा गुन्हा केला, तेव्हा त्यांना कोणीही पाठिंबा दिला नव्हता.

हा वाद शिल्पा शिंदे हिने एका पॉडकास्टदरम्यान केलेल्या एका खळबळजनक कबुलीमुळे निर्माण झाला आहे. या मुलाखतीत शिल्पाने कबूल केले होते की, तिने भूतकाळात 'भाभीजी घर पर हैं'या मालिकेच्या निर्मात्यावर लैंगिक छळाचे खोटे आरोप केले होते. शिल्पाच्या या वक्तव्यानंतर टेलिव्हिजन विश्वात आणि समाजमाध्यमांवर तिच्यावर प्रचंड टीका झाली. हिना खान हिने यापूर्वीही दीर्घ पोस्ट लिहून शिल्पाच्या या विधानाचा जाहीर निषेध केला होता. त्यानंतर शिल्पा शिंदे हिने एक व्हिडिओ जारी करून टीकाकारांना उत्तर दिले होते.




## 'दृश्यम ३'बाबत धक्कादायक खुलासा

**अभिनेता** अजय देवगण याच्या मुख्य भूमिका असलेल्या 'दृश्यम' या ब्लॉकबस्टर फ्रेंचायझीच्या तिसऱ्या भागाची म्हणजेच 'दृश्यम ३' या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून, आता या चित्रपटाशी संबंधित काही अत्यंत महत्त्वाची आणि विशेष माहिती समोर आली आहे. हिंदीत बनणारा 'दृश्यम ३' हा चित्रपट मूळ मल्याळम आवृत्तीची हुबेहूब नक्कल नसेल, असा मोठा खुलासा झाला आहे. यापूर्वी प्रदर्शित झालेले 'दृश्यम'(२०१५) आणि 'दृश्यम २'(२०२२) हे हिंदी चित्रपट मूळ मल्याळम चित्रपटांशी मिळतेजुळते होते. मात्र, तिसऱ्या भागाच्या बाबतीत निर्मात्यांनी कथेमध्ये आणि कथानकातील अनपेक्षित वळणांमध्ये (ट्विस्ट्स) प्रचंड मोठे बदल केले आहेत. हिंदी प्रेक्षकांच्या आवडीनुसार हा बदल करताना 'दृश्यम'च्या मूळ विश्वाला कुठेही धक्का लागणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक अभिषेक पाठक यांनी एका मुलाखतीत याविषयी अधिक स्पष्टता दिली. त्यांनी सांगितले की, मल्याळम चित्रपट हा एक भावनिक कौटुंबिक ड्रामा आहे, तर आमचा हिंदी चित्रपट हा 'फॅमिली थ्रिलर'(कौटुंबिक थरारपट) म्हणून विकसित करण्यात आला आहे. दोन्ही आवृत्तींचा मुख्य भावनिक गाभा एकच असला, तरी त्यांची मांडणी पूर्णपणे वेगळी असेल.

## आलिया आणि शर्वरीचे महिला क्रिकेटला 'प्रोत्साहन'



**यशराज** फिल्म्स आणि जिओ हॉटस्टार यांनी एकत्र येत भारतीय चित्रपटसृष्टी आणि क्रिकेट या दोन मोठ्या क्षेत्रांचा संगम साधणारी एक विशेष मोहीम सुरू केली आहे. आगामी 'आयसीसी म हिला टी-२० विश्वचषक' स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, एक खास व्हिडिओ प्रसारित करण्यात आला असून, त्यामध्ये आगामी 'अल्फा' चित्रपटातील अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ या महिला क्रिकेटला प्रोत्साहन देताना दिसत आहेत.

या व्हिडिओमध्ये आलिया आणि शर्वरी त्यांच्या आगामी 'अल्फा' चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी एका मुलाखतीची तयारी करताना दाखवल्या आहेत. संवादादरम्यान 'भारतीय क्रिकेट संघ' असे उत्तर देतात. त्यावर निवेदक पुरुष क्रिकेट संघाच्या कामगिरीबद्दल बोलू लागतो. परंतु, हा संवाद तेव्हा एका अनपेक्षित वळणावर येतो जेव्हा दोघीही त्यांच्या आवडत्या महिला क्रिकेटपटूंची नावे घेऊ लागतात. यामुळे गोंधळलेला निवेदक जेव्हा त्यांचा उल्लेख 'भारतीय महिला क्रिकेट संघ' असा करतो, तेव्हा आलिया त्याला दुरुस्त करत एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडते. ती म्हणते की, हा केवळ 'भारतीय क्रिकेट संघ'आहे, त्यामुळे महिलांच्या संघासाठी स्वतंत्रपणे वेगळा शिक्का लावण्याची गरज काय? हा संदेश खेळातील समान हक्क आणि ओळखीवर प्रकाश टाकतो.

## प्रीतीची पावले ज्वेलरी उद्योगात



**अभिनेत्री** आणि उद्योजिका प्रिती झिंटा हिने 'जाकार्ती ज्वेलरी' या तिच्या स्वतःच्या लक्झरी ज्वेलरी ब्रँडची अधिकृत घोषणा करत या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. मुंबईतील वांद्रे (बांद्रा) परिसरामध्ये या ब्रँडच्या नवीन स्टोअरचे शानदार उद्घाटन करण्यात आले असून, या सोहळ्याला बॉलिवूडमधील तिच्या अनेक मित्रांनी उपस्थिती लावली होती.

या खास उद्घाटनाच्या प्रसंगी अभिनेत्री सेलिना जेटली, अभिनेता बॉबी देओल आणि युलिया वंतूर प्रितीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी उपस्थित होते. चित्रपट आणि क्रीडा क्षेत्रानंतर आता प्रिती झिंटाने रिटेल आणि लक्झरी दागिन्यांच्या व्यवसायात आपले नाव कोरले असून, तिच्या या नवीन प्रवासाची ही एक महत्त्वाची सुरुवात मानली जात आहे.



## रकुलचा गौप्यस्फोट

**अभिनेत्री** रकुल प्रीत सिंग हिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत जिममधील एका अत्यंत गंभीर अपघाताविषयी आणि त्यामुळे आलेल्या मानसिक व शारीरिक संकटाविषयी भाष्य केले आहे. नेहमी आरोग्याला आणि व्यायामाला प्राधान्य देणाऱ्या रकुलला या एका चुकीमुळे तब्बल ४० दिवस पूर्णपणे अंथरुणाला खिळून राहावे लागले होते. रकुल प्रीत सिंग हिने तिचे पती जॅकी भगनानी यांच्यासोबत नेहा धुपिया आणि अंगद बेदी यांच्या 'डबल डेट' या टॉक शोमध्ये हजेरी लावली होती. या दरम्यान तिने या वेदनादायक अनुभवाच्या आठवणींना उजाळा दिला.

हा अपघात जिममध्ये वजन उचलण्याच्या (डेडलिफ्ट) एका चुकीच्या निर्णयामुळे झाला होता. रकुल ८० किलो वजनाचे डेडलिफ्ट करण्याचा प्रयत्न करत होती. सहसा ती व्यायामाचे सर्व नियम आणि खबरदारी पाळते. परंतु त्या दिवशी तिने एक सर्वात महत्त्वाची गोष्ट टाळली; तिने पाठीला आधार देणारा सेफ्टी बेल्ट न घालताच एवढे मोठे वजन उचलण्याचा निर्णय घेतला.

याविषयी बोलताना रकुल म्हणाली की, तुमचा ट्रेनर तुम्हाला काहीही सांगत असला, तरी 'डेडलिफ्ट'हा अत्यंत चुकीचा व्यायाम प्रकार आहे. तो केवळ एक 'इगो लिफ्ट'असतो. त्या दिवशी बेल्ट न वापरण्याच्या एका चुकीमुळे मला 'स्लिप डिस्क'चा त्रास झाला आणि पुढील ४० दिवस सक्तीने बेड रेस्ट घ्यावी लागली.

---

## कोल्हापुरात भीषण अपघात
## एकाच कुटुंबातील ४ जण ठार

■ कोल्हापूर

**जिल्ह्यातील** आजरा तालुक्यातील उत्तुर-बहिरेवाडी मार्गावर दुचाकी आणि टेम्पोची धडक झाल्याने एकाच कुटुंबातील चौघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये पती-पत्नी आणि दोन मुलांचा समावेश आहे.


या भीषण अपघातातील मृतांची नावे- दीपक चांदे (३९), शोभा चांदे (३५), जय चांदे (१०), पूर्वा चांदे (७) अशी आहेत. मूळचे व्होन्याळी गावचे हे चांदे कुटुंबिय दुंडगे गावाला जात होते. हे सर्वजण मुंबईत वास्तव्यास होते, पण उन्हाळी सुट्टीसाठी गावाकडे आले होते. गावाकडे नवीन घर बांधल्यानंतर पहिल्यांदाच आठ दिवस राहण्यासाठी संपूर्ण कुटुंब मुंबईहून गावाकडे आले होते.चांदे कुटुंबिय शुक्रवारी मुंबईला परत जाणार होते, मात्र त्याआधी काल गुरुवारी पाहुण्यांना भेटण्यासाठी दुंडगे गावाला निघाले होते. परंतु टेम्पोची धडक बसल्याने चौघांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेने जिल्ह्यात शोककळा पसरली.

## आता 'जेमिनी' प्रश्नाचे उत्तर देण्याआधी
## माणसासारखा सखोल विचार करणार

■ मुंबई-

**'एआय'** अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता जगतात आघाडीवर असलेल्या गुगलने आपल्या 'जेमिनी' एआय चॅटबॉटसाठी एक मोठा आणि महत्त्वपूर्ण प्रकल्प जाहीर केला आहे. गुगलने अँड्रॉइड, आयओएस आणि वेब प्लॅटफॉर्मवर विचाराची नवी पातळी गाठण्यास सुरुवात केली आहे.

या अंतर्गत वापरकर्त्याला आता पुढचा सखोल विचार करण्याची सुविधा मिळणार आहे. यात कोणत्याही कठीण किंवा गुंतागुंतीच्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्ता सखोल विचार आणि विश्लेषण करील. गुगलचा दावा आहे की, यामुळे जेमिनीकडून मिळणारी उत्तरे पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने अचूक असतील. विशेष म्हणजे, ही सोय भारतासह जगभरातील वापरकर्त्यांना मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. हा बदल जेमिनी ३.१ फ्लॅश-लाइट, जेमिनी ३.५ फ्लॅश आणि जेमिनी ३.१ प्रो मॉडेल्समध्ये केला जात आहे. सामान्यतः या मॉडेल्समध्ये




दोन वैचारिक पातळी दिल्या आहेत, ज्यातून उत्तरे तयार केली जातात. या नव्या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'विस्तारित विचार' पातळी आहे. कठीण गणिती कोडी, कोडिंग आणि क्लिष्ट व्यावसायिक समस्या सोडवण्यासाठी याचा उपयोग केला जाऊ शकतो आहे.

## ताम्हिणी घाटात पाय घसरून
## दरीत कोसळलेला गंभीर जखमी

■ पुणे

**कोकणातून** पुण्याकडे प्रवास करत असताना ताम्हिणी घाटात शौचास गेलेल्या एका व्यक्तीचा पाय घसरून तो खोल दरीत कोसळल्याची घटना आज पहाटे दोन वाजताच्या सुमारास घडली. ताम्हिणी घाटातील वॉटरफॉल पॉईंटजवळ हा अपघात झाला असून, संबंधित व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे.

ही व्यक्ती आपल्या मुलासोबत कारने चिपळूणहून पुण्याकडे येत होती. ताम्हिणी घाट परिसरात आल्यानंतर शौचास जाण्याची गरज भासल्याने त्यांनी वाहन रस्त्याच्या कडेला थांबवले. मात्र परिसरात दाट अंधार असल्याने दरीची खोली लक्षात न आल्याने त्यांचा तोल गेला आणि ते थेट दरीत कोसळले. वडील अचानक नजरेआड झाल्याने घाबरलेल्या मुलाने तातडीने पोलिसांना माहिती दिली.

## नाशिक कुंभमेळ्याच्या निमित्ताने
## पाच रेल्वे स्थानकांचा कायापालट

■ नाशिक

**आगामी** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये पायाभूत सुविधा निर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. याचाच एक भाग म्हणून मध्य रेल्वेच्या नाशिक विभागातील पाच रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यात येणार आहे.देवळाली, नाशिक रोड, ओढा, खेरवाडी आणि कसबे सुकेने या रेल्वे स्थानकांच्या त्यामध्ये समावेश आहे.

कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून लाखो भाविक नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये येणार आहेत. त्यांच्या सुविधेसाठी या रेल्वे स्थानकांवर अद्ययावत सोयी-सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने या स्थानकांवरील फलाटांची संख्या वाढवणे, रेल्वे यार्डचे नूतनीकरण करणे, इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंक सिस्टिम अद्ययावत करणे, पादचारी पूल बांधणे अशी कामे केली जात आहेत.

देवळाली रेल्वे स्थानकात अतिरिक्त उच्च स्तरीय फलाटची निर्मिती, इंटरलॉकिंग सिस्टिम अद्ययावत करणे, पादचारी पूल आणि मलनिःसारण प्रकल्प आदी कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. या स्थानकावर ५५५ मीटर लांबीचा नवीन फलाट बांधण्याचे कामही सुरू आहे.



पावसाळ्यात दोन महिने मासेमारीवर बंदी असल्यामुळे वरळी कोळीवाड्यातील मच्छिमार बांधवांनी आपल्या बोटी समुद्रातून किनाऱ्यावर आणल्या

## शालेय गणवेशाचा निधी कापला
## कापड व शिलाईला २४० रुपये

■ मुंबई

**शैक्षणिक** वर्ष २०२६-२०२७ साठी पालिका शालेय गणवेशाच्या निधीत शासनाने थेट २०० टक्क्यांची कपात केल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. प्रति गणवेश ३०० रुपये दिले जात असताना यंदा शाळांच्या खात्यात कापड व शिलाई यासाठी केवळ प्रत्येकी २४० रुपये जमा करण्यात आले आहेत. वाढत्या महागाईत ही रक्कम अपुरी असल्याचे सांगत शिक्षक संघटनांनी या योजनेची अंमलबजावणी करण्यास नकार दर्शविला असून, किमान ५०० रुपये निधी देण्याची मागणी केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील १४ पंचायत समिती क्षेत्रांतील १ लाख १ हजार ३३१ लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी प्रति गणवेश २४० रुपये या दराने एकूण २ कोटी ४३ लाख १९ हजार ४४० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निधीतील कपातीमुळे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

## शिवसेना संपवण्याची विनायक राऊतांची सुपारी ! बाळ मानेंचा गंभीर आरोप

■ मुंबई

**रायगड**-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधान परिषद मतदारसंघातील उबाठाचे अधिकृत उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. पक्षाकडून त्यांच्यावर पैसे घेऊन उमेदवारी मागे घेतल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर बाळ माने यांनी माजी खासदार विनायक राऊत यांनी शिवसेना संपवण्याची सुपारी घेतली असून, ते पदाधिकारी नेमण्यासाठी ५० हजार घेतात, असा गंभीर आरोप केले आहेत.

याबाबत बाळ माने म्हणाले की, आमच्याकडे केवळ ५५ मतदार होते. मला सूचक म्हणून सही देण्यासाठीही कोणी तयार नव्हते. निवडणूक लढवून पराभूत होण्यापेक्षा दोन पावले मागे घेणे योग्य वाटले. हा निर्णय घेण्यापूर्वी मी पक्षातील वरिष्ठ नेत्यांना कल्पना दिली होती. संजय राऊत आणि विनायक राऊत यांनी माझ्यावर जे आरोप केले आहेत ते सिद्ध करून दाखवा, मी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेईन.

बाळ माने यांनी पुढे आरोप केला की, विनायक राऊत सातत्याने उद्धव ठाकरे यांना चुकीची माहिती देतात. माझ्या पक्षप्रवेशालाही त्यांनी अडथळे आणले होते. पालघर लोकसभा निवडणूक असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, त्यांनी अनेकदा पक्षविरोधी भूमिका घेतली आहे.कार्यकर्त्याला नेमणूक पत्र द्यायचे असेल, तरी विनायक राऊत ५० हजार रुपये घेतात.

## नंदिनी नदी स्वच्छता मोहिमेत
## महाजनांना पिस्तुल सापडली

■ नाशिक

**नाशिक** शहरातील उंटवाडी परिसरातील नंदिनी नदीपात्रात सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेदरम्यान मंत्री गिरीष महाजन यांना गंजलेल्या अवस्थेतील गावठी पिस्तुल आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

नदीतील कचरा आणि गाळ काढण्याचे काम सुरू असताना पिस्तुल सापडल्याने उपस्थितांमध्ये एकच खळबळ माजली. तत्काळ स्थानिक पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पिस्तुल ताब्यात घेतले. या प्रकरणाची पोलिसांनी गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे. पिस्तूल नेमके कोणाचे आहे, ते नदीत कधी आणि कोणत्या कारणासाठी टाकण्यात आले, याचा शोध घेतला जात आहे.


## दीनानाथ रुग्णालयातील चिमुरडीच्या
## मृत्यूप्रकरणी तज्ज्ञ समिती स्थापन

■ पुणे

**पुण्यातील** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या सहा वर्षीय मुलीच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या तज्ज्ञांची पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तसेच औषधोपचार, नेत्ररोग, बालरोग आणि न्यायवैद्यक विभागांचे प्रमुख यांचा समावेश आहे.

मुलीवर १८ मे रोजी या रुग्णालयात डोळ्यांशी संबंधित शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शस्त्रक्रियेनंतर त्याच दिवशी तिचा मृत्यू झाला. या प्रकरणात वैद्यकीय हलगर्जीपणा झाल्याचा आरोप करत मुलीच्या कुटुंबियांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली होती. या घटनेची प्राथमिक चौकशी करण्यासाठी पुणे महापालिकेने २२ मे रोजी पाच सदस्यीय समिती नियुक्त केली होती. या समितीने १ जून रोजी आपला प्राथमिक अहवाल महापालिकेला सादर केला. पुढील तपास ससून रुग्णालयाच्या अधीक्षकांच्या देखरेखीखाली तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात यावा, अशी शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.समितीने उपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांशी चर्चा केली असली तरी शवविच्छेदन अहवाल उपलब्ध नसल्याने मृत्यूचे नेमके कारण निश्चित करता आले नसल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२८



**आडवे शब्द –**

२. गरीब स्वभावाचा, निरागस ५. गुलामी ८. पाणी ११. अधिकार १३. क्रूर, निर्दय १५. चेहरा आणि हातवाऱ्यांनी भावना व्यक्त करणे १७. दडपशाही १९. गुंड, समाजकंटक २०. नियंत्रण, लगाम २१. गुडघ्याच्या खालचे हाड २२. बाण, तीर २३. लांब पल्ल्याची तलवार २४. युद्धात जिंकणे २५. आंघोळ न केलेला २७. सद्वर्तन, सचोटी, धर्मपरायणता २९. प्रत्येक ३०. पवित्र, पुनीत ३१. जखमेतून वाहणारे रक्त ३२. मोठी वांगी भाजून केलेली खमंग भाजी ३५. मासा पकडण्याचा हूक ३६. प्रेमाने वागणारा ३७. तल्लीन ३८. पातळ पदार्थ ४०. बेअक्कल, मूर्ख ४२. सुकामेव्यातील हिरवा जिन्नस ४३. अभिजन वर्गाची मान्यता मिळालेले सामाजिक संकेत ४५. आगळीक ४८. शनीचा खडा ५०. टिकाव ५१. कबूतर ५३. निभाव ५४. धांदल, घाई ५७. घोड्याची नियंत्रक दोरी ५९. सौंदर्य ६०. तुच्छतेने बोलणे ६२. काल्याची चव ६३. प्रेरणा, गती ६५. एक शेंगभाजी, बावच्या ६८. शिरोभूषणाचा प्रकार ७०. वेळू, बांबू ७२. बिचारा ७३. धाव, मर्यादा ७४. विनंतीचे पत्र ७५. थाटमाट ७८. मुलीचा पती ७९. चणे ८१. अमोघ उपाय, रामाने मारलेला तीर ८२. चारित्र्य, शील ८४. नारळ ८५. आवश्यकता ८६. जीव; आत्मा ८७. लहान मूल ८९. लायकी ९०. स्त्री, ललना ९२. उपवासाला याची खिचडी चालते ९४. इमारतीच्या पायात टाकलेले ओबडधोबड दगड ९६. संप्रदाय ९८. फणसाचा प्रकार ९९. इंग्रजी सहावा महिना १००. अरिष्ट १०२. आकर्षक १०३. माणूसकी १०५. नामांकित १०८. ईश्वर १०९. लष्कर ११०. गुरांचे निवांत भोजन

**उभे शब्द –**

१. मनात संशय असलेला ३. चिमुकला ४. फुरसत ५. कागदाचा अखंड तुकडा ६. लाकडी जिना ७. चारशे ऐंशी कागद ९. धमकी देणे १०. दरवाजा १२. खिडकी १३. राजा, महीपाल १४. कृश बांध्याचा १६. धंद्यातली पार्टनरशिप १८. हातचलाखीची जादू २२. शंभर २४. एक हलके धान्य, सातू २६. प्रत्येक दिवशी २८. अति कृपण; खाष्ट २९. घोडा, तुरंग ३०. बाळाला झोपवण्याची जागा ३१. कुवत, आवाका ३२. मोडलेले ३४. पोह्यांचा गार पदार्थ ३५. हरवलेले ३७. गोड दूध व आईसक्रीमपासून केलेला पदार्थ ३९. नव्या पालवीचा ऋतू ४१. आवड; माधुर्य ४३. फाल्गुन महिन्यातला सण ४४. रगेल, ताठर ४५. झाडाचा बुंधा ४६. बंगालची राजधानी (जुने नाव) ४७. पाण्याचा सूक्ष्म कण ४९. विलासी स्त्री ५२. सरोवर, नदीचा काठ ५३. युद्धात हरवणे ५५. पाणी पिण्याचे लहान भांडे ५६. घाणेरडे, अव्यवस्थित ५८. मागाहून, नंतर ६१. अनृत, असत्य ६४. टुमणे, धोशा ६६. बोलणे ६७. देवापुढे लावलेला मोठा दिवा ६९. वर्तुळ, रिंगण ७०. कर्जात बुडालेला ७१. डौलदार, बांधेसूद ७२. अग्नी, ७३. हिरवा वाटाणा ७४. अमरेश्वर, शिवशंकर ७६. शिकारीच्या वेळी टेहळणीसाठी झाडावर उंच बांधलेली तात्पुरती बैठक ७७. मुरगळल्यामुळे होणारी वेदना, चमक ७८. मुद्दाम ८०. कष्टमय जीवन ८१. संताप ८३. सेतू ८४. केशतेलातली उष्ण औषधी वनस्पती ८६. पूर्व दिशा ८७. ब्रीद, खाक्या ८८. संपूर्ण काळा रंग असलेली कोंबड्याची विशेष जात ८९. न्यारा, निराळा ९१. भेद, अंतर ९३. राक्षस ९५. पैशांची थैली ९६. कमळ ९७. चिंतन ९८. हंगाम, फुलोरा १०१. सुंठीचे पूर्वरूप १०२. पुरुष १०३. मंजूर १०४. वायर १०६. समूह १०७. सोटा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२७ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. विलंब ४. काडीमोड ७. बालिका १०. वर्धिष्णू ११. लघळ १३. पदरव १४. पट्टीचा १५. लोकवान १७. आलय १८. टापशी २०. तटाक २२. खळखळाट २५. विप्र २७. सीमा २८. वाखाणणी ३०. ताटाखालचे मांजर ३२. कर ३३. सदावर्त ३५. गळ ३६. गवत ३७. ढोर ३८. विटप ४०. नमक ४१. धुंद ४२. पूतना ४५. वसुधा ४६. रव ४८. रेडा ४९. गाजरगवत ५१. नतमस्तक ५५. मवाळ ५६. वन ५७. वेळ ५९. राडेबाजी ६०. खालसा ६१. फटफटी ६३. नाना ६५. निरीक्षक ६७. शिल्लक ६८. फाटक ७०. इलाखा ७१. मारामार ७४. कमलाकर ७६. लफ्फा ७७. खुला ७८. लट्टू ७९. जीवन ८१. बकबक ८२. जवस ८४. बोजा ८७. काटक ८७. परत ८८. लाखो ९१. कालवड ९२. शिशू ९३. कंटक ९४. श्रवणीय ९७. बाळ ९८. अजगर १००. रिकीब १०१. मजा १०२. दादला १०३. शुभ्र १०४. रस्ता १०५. रक्त

**उभे शब्द :** १. अवचित २. विष्णुलोक ३. बलवान ४. काळ ५. मोल ६. सदय ७. बावटा ८. कापशी ९. विचारप्रवर्तक १२. घन १३. पलटवार १६. झळ १७. आळा १९. पक्व २१. टाळाटाळ २२. खमाज २३. खर्च २४. दणकट २६. अलगद २७. सीमांतपूजन २९. निदान ३०. तागडी ३१. चेव ३२. करवत ३४. वमन ३८. विधान ३९. परम ४१. धुंडाळणे ४३. तर ४४. नागवेल ४७. वस्तरा ४८. रेवा ४९. गावकरी ५०. वळसा ५२. तरफ ५३. कडेलोट ५४. खजील ५५. महिना ५८. कफल्लक ६०. खाकरा ६२. टकमक ६४. नाइलाज ६५. निखालस ६६. क्षमा ६८. फारकत ६९. कलकलाट ७२. माजी ७३. रवका ७५. कबर ८०. नटराज ८३. वर्णी ८४. बोलबाला ८५. जावळ ८७. पशू ८९. खोकला ९०. आश्रय ९२. शिरस्ता ९३. कंबर ९५. वजा ९६. यदा ९८. अभ्र ९९. गर १००. रिता

# मुंबई पालिकेच्या कार्यक्रमात मराठी भाषेचा उल्लेख नाही

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात मराठी भाषेचा वापर न केल्याचा आरोप होत आहे. कार्यक्रमस्थळी लावण्यात आलेले फलक आणि माहितीफलक केवळ इंग्रजी भाषेत होते. उबाठाचे नगरसेवक सचिन पडवळ यांनी याचा निषेध करत संबंधित आयोजकांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सचिन पडवळ यांनी आरोप केला की, मुंबई महापालिकेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची जबाबदारी एका खासगी कंपनीकडे सोपविण्यात आली होती. मात्र कार्यक्रमात मराठी भाषेचा कुठेही वापर करण्यात आला नाही. फलक, सूचना आणि कार्यक्रमाशी संबंधित माहिती केवळ इंग्रजी भाषेत होती. महापालिकेचा कारभार मराठीतून व्हावा, ही आमची सातत्याची मागणी आहे. स्वतः महापौर रितू तावडे यांनीही महापालिकेचा कारभार मराठीत होईल, असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात महापालिकेच्या कार्यक्रमातच मराठी भाषेला स्थान न दिल्याने आश्चर्य व्यक्त करावे लागते. या प्रकरणी संबंधित आयोजकांवर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात महापालिकेच्या सर्व कार्यक्रमांमध्ये मराठी भाषेचा अनिवार्य वापर करण्यात यावा.

**उबाठाकडून कारवाईची मागणी**




# पर्यावरण बदलाचा अर्थव्यवस्थेलाही फटका बसणार

पान १ वरून

करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या विकास आराखड्यात विकासाला पर्यावरण आणि सौंदर्याची जोड नसल्यास तो पोकळ ठरतो, हा मुद्दा मांडण्यात आला होता. सध्याच्या घडामोडींकडे पाहिल्यास रस्ते आणि पूल उभारण्याच्या स्पर्धेत मूलभूत पर्यावरणीय संतुलन दुर्लक्षित होत असल्याचे दिसते. एका साध्या पावसातही शहरांची दाणादाण उडण्याची परिस्थिती निर्माण होते. यंदाच्या तीव्र उष्णतेमुळे देशाच्या उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम झाला असून, सुमारे १५९ अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. दरवर्षी सुमारे १६० अब्ज कामाचे तास उष्णतेमुळे वाया जात आहेत. पर्यावरणीय बदलांचा परिणाम म्हणून देशाच्या जीडीपीत २.५ ते ४.५ टक्क्यांची घट होण्याचा अंदाज आहे.

ते पुढे म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत सुमारे १.७३ लाख हेक्टर जंगल जमीन खाणकाम, रस्ते आणि इतर प्रकल्पांसाठी देण्यात आली. हे क्षेत्रफळ जवळपास संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांच्या एकत्रित क्षेत्राएवढे आहे.

शहरांमध्ये हिरवळ कमी होत चालली आहे, झाडांची तोड वाढली आहे, डोंगर पोखरले जात आहेत आणि नद्या प्रदूषित होत आहेत. अशा परिस्थितीत तरुण पिढी सोशल मीडियामध्ये रमते. कारण प्रत्यक्षात पाहण्यासारखे निसर्गरम्य वातावरण उरलेले नाही. पर्यावरणाचा प्रश्न आता केवळ निसर्गप्रेमींपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो अर्थव्यवस्था, आरोग्य, शेती आणि शहरांच्या भवितव्याशी थेट संबंधित झाला आहे.

निसर्गातील बदलांचा परिणाम प्रत्येकाच्या आयुष्यावर होत असून, वेळेत उपाययोजना न झाल्यास पुढील पिढ्यांसाठी परिस्थिती अधिक गंभीर होणार आहे.

# कॉकरोच जनता पार्टीचा आज दिल्लीत एल्गार

पान १ वरून

यांनी जबाबदारी स्वीकारावी ही आमची एकच मागणी आहे. आम्ही कायदा न तोडता शांततेत आंदोलन करणार आहोत, असे दीपके म्हणाला आहे.

**सीजेपीच्या प्रेससाठी मनोज झा यांनी दिले पत्र**

कॉकरोच जनता पार्टी प्रवक्त्यांची ३ जून रोजी संसदेच्या कॉन्स्टिट्युशनल क्लबमध्ये पत्रकार परिषद झाली होती. ज्या पक्षाची अद्याप रितसर नोंदणी झालेली नाही त्या पक्षाला कॉन्स्टिट्युशन क्लबमध्ये पत्रकार परिषद घेण्याची परवानगी कशी काय मिळाली, असा सवाल अनेकांनी उपस्थित केला होता. राष्ट्रीय जनता दलाचे नेते खासदार मनोज झा यांनी आज त्याबद्दल स्पष्टीकरण दिले. सीजेपीला पत्रकार परिषदेसाठी परवानगी द्यावी असे मी माझ्या सहीने विनंती पत्र दिले होते, असे झा यांनी सांगितले. त्याचवेळी आपण सीजेपीचे समर्थन करत नाही, असेही झा यांनी स्पष्ट केले.

# कुणाल कामरा-अंधारे हक्कभंग प्रकरणाची सुनावणी १६ जूनला

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत सादर केल्याप्रकरणी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा आणि उबाठा उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या विरोधात दाखल हक्कभंग प्रकरणाची पुढील सुनावणी १६ जून रोजी होणार आहे. विधानपरिषदेचे आमदार आणि विशेष हक्कभंग समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात या प्रकरणी बैठक पार पडली. या बैठकीत प्रकरणाचा आढावा घेण्यात आला असून पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आली. या प्रकरणात १६ जून रोजी अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# 'त्या' कलिंगडमध्ये विष नव्हतेच फोरेन्सिक अहवालामुळे गूढ वाढले

पान १ वरून

होते. त्यांच्या जेवणात चिकन पुलाव हा पदार्थ होता. जेवल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास या चौघांनी कलिंगड खाल्ले. काही वेळातच त्या सर्वांना अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

हे बळी नेमके कशामुळे गेले याचा उलगडा प्राथमिक तपासातून होऊ शकला नाही. त्यामुळे पायधुनी पोलिसांनी डोकाडिया कुटुंबियांनी जेवताना वापरलेले चमचे, किचन नाईफ, प्लेट, उरलेला चिकन पुलाव, कलिंगडचे उरलेले तुकडे आणि या साऱ्यांच्या पोटातील व्हिसेरा सखोल तपासासाठी फोरेन्सिक प्रयोगशाळेकडे पाठवला होता.

पहिल्या फोरेन्सिक अहवालात कलिंगडमध्ये आणि पोटातील व्हिसेरामध्ये झिंक फॉस्फॉईडचे अंश आढळले, असा निष्कर्ष काढण्यात आला होता. तो अहवाल समाधानकारक नाही असे वाटल्याने पोलिसांनी दुसऱ्यांदा फोरेन्सिक तपासणी करून घेण्याचा निर्णय घेतला. या दुसऱ्या फोरेन्सिक तपासणीचा अहवाल गेल्या आठवड्यात आला. त्यात कुठेही झिंक फॉस्फॉईडचा अंश नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आल्यामुळे या प्रकरणीचे गूढ अधिकच वाढले आहे. या प्रकरणाचा आता सुरुवातीपासून नव्याने तपास करण्याचा निर्णय पायधुनी पोलिसांनी घेतला आहे.

**जाहीर सूचना**

**न्यू पद्मावती को-ऑप. हौ. सो. लि.** (जुना सर्वे क्र. ९९, नवीन सर्वे क्र. १५७, प्लॉट क्र. ए, आचोले रोड, नालासोपारा पूर्व, पालघर - ४०१२०९) ही संस्थेतील **दुकान क्र. ५** हे बिल्डर **मेसर्स पद्मावती कन्स्ट्रक्शन** (भागीदारः महेश एफ. सेठ व मुकुंद जे. शाह) यांच्याकडून हस्तांतरिती **श्रीमती उर्मिला एम. सेठ** यांच्या नावे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया करीत आहे. जर कोणास यावर काही हरकत किंवा दावा असल्यास, त्यांनी १४ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह सोसायटी कार्यालयात संपर्क साधावा. मुदतीनंतर कोणत्याही दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

**दिनांकः 06-06-2026 चेअरमन/सेक्रेटरी**

**THE MUNICIPAL CO OPERATIVE BANK LTD., MUMBAI**

MUNICIPAL BANK BHAVAN, 245, P. D' MELLO ROAD, FORT, MUMBAI –400 001

**TEL:** +91-22-2271 7800/879

**EMAIL:** mcbank@mcbmumbai.com/ estate@mcb.bank.in

**TENDER NOTICE**

The Municipal Co-Op. Bank Ltd., Mumbai has invites sealed tenders for **"TENDER DOCUMENT FOR Comprehensive Annual Maintenanace Contract (AMC) of Air Conditioners in Head Office,Branches & ATM's"** Tender documents shall be downloaded from the bank's website: **www.mcb.bank.in** from 06/06/2026. Last date and time for submission of Tender : On or Before 15/06/2026 up to 5.00 PM

**Place: Mumbai** **Sd/-**
**Date: 06/06/2026** **General Manager**

**०२.०६.२०२६ रोजीच्या विक्री सूचनेबाबतचे शुध्दिपत्रक**
**नाकोडा लिमिटेड (परिसमापनात)**

**सीआयएनः** L17111GJ1984PLC045995
**(कंपनी)**
**नोंदणीकृत कार्यालयः ब्लॉक क्र.१ आणि १२ ते १६, गाव - करंज, तालुका - मांडवी, जिल्हा - सुरत, गुजरात - ३९४११०**

**नाकोडा लिमिटेड (कंपनी) च्या परिसमापकाने** २ जून २०२६ रोजी विक्रीची सूचना जारी केली होती आणि कंपनीच्या विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र बोलीदारांना आमंत्रित केले होते.

पात्र बोलीदारांच्या स्पष्टीकरणासाठी एका टीपमध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यासाठी हे शुद्धिपत्रक जारी केले जात आहे.

**महत्त्वाच्या सूचना**

आम्ही ०२.०६.२०२६ रोजीच्या विक्री सूचनेच्या तळाशी नमूद केलेल्या महत्त्वाच्या सूचनांचा संदर्भ घेत आहोत.

**ब्लॉक ई आणि ब्लॉक डी अंतर्गत मालमत्तेच्या विक्रीबाबतच्या महत्त्वाच्या नोंदी मधील शेवटची नोंद खालीलप्रमाणे वाचावी:**

याद्वारे असेही सूचित करण्यात येते की, ब्लॉक ई अंतर्गत असलेल्या मालमत्तेची यशस्वी विक्री झाल्यानंतरच ब्लॉक डी अंतर्गतची विक्री निश्चित केली जाईल. जर ब्लॉक ई साठी कोणत्याही बोली प्राप्त झाल्या नाहीत, तर ब्लॉक डी अंतर्गतची विक्री आपोआप रद्द होईल.

विक्री सूचनेतील ही शुध्दिपत्रक/पुरवणी ही ०२.०६.२०२६ रोजी प्रकाशित झालेल्या विक्री सूचनेचाच एक अविभाज्य भाग असेल आणि या तारखेपासून, सदर विक्री सूचना नेहमी या शुध्दिपत्रकासह/ पुरवणीसह एकत्रितपणे वाचली जाईल.

**दिनांक ०२.०६.२०२६ रोजीच्या विक्री सूचनेतील इतर सर्व अटी व शर्ती कायम राहतील.**

**रवींद्र कुमार गोयल**
**परिसमापक**
**मे. नाकोडा लिमिटेड**
IBBI Reg. No. IBBI/IPA-001/IP-P-02019/2020-2021/13098
नोंदणीकृत पत्ता: ईडन आय - ८०७, एसजी हायवे, गोदरेज गार्डन सिटी, जगतपुरा, अहमदाबाद-३८२४७०
ईमेल: ravindra1960_goyal@yahoo.co.in,ravindranakoda@gmail.com
संपर्क पत्ता:-कार्यालय क्र.४२८, टॉवर-ए, भूतानी सायबर पार्क, ब्लॉक-सी, फेज-२, प्लॉट क्र.सी-२८ आणि सी-२९, सेक्टर-६२, नोएडा-२०१३०९

**ठिकाण : अहमदाबाद**
**दिनांक : ०५.०६.२०२६**

**जाहीर सूचना**

याची नोंद घ्यावी की, **दिनेश गोपीलाल संघवी,** हे **श्रीमती रूपाबेन गोपीलाल संघवी आणि दिवंगत गोपीलाल यू. संघवी** यांचा मुलगा असून, तेत्यांच्या आईच्या नियंत्रणात नसून विविध असामाजिक संबंधांमध्ये गुंतलेले आहेत तसेच स्वतःच्या आईसौ. रूपाबेन गोपीलाल संघवी यांना त्रास व छळ देण्याच्या कृत्यांमध्ये सहभागी आहेत. तसेच, ते सन १९८९ पासून स्वतःच्या इच्छेने आपल्या कुटुंबासह स्वतंत्रपणे राहत असून आमच्याशी कोणताही संबंध ठेवत नाहीत.

सदर परिस्थितीत, मी माझा सदर मुलगा **दिनेश गोपीलाल संघवी** तसेच त्याची पत्नी व मुले यांना माझ्यापासून बेदखल व संबंधविच्छेदित करीत असून, माझ्या कोणत्याही जंगम व स्थावर मालमत्तेवर तसेच वडिलोपार्जित मालमत्तेवर कोणताही हिस्सा किंवा हक्क मागण्यापासून त्यांना वंचित करीत आहे आणि त्यामुळे, **सर्वसामान्य जनतेस** याद्वारे सूचित करण्यात येते की, कोणतीही व्यक्ती, वित्तीय संस्था किंवा बँक यांनी दिनेश गोपीलाल संघवी यांच्याशी कोणताही आर्थिक अथवा इतर कोणताही व्यवहार केल्यास तो पूर्णपणे त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर असेल, अशा कोणत्याही व्यवहारासाठी **सौ. रूपाबेन गोपीलाल संघवी आणि/किंवा त्यांचा दुसरा मुलगा गणेशमल गोपीलाल संघवी अथवा कुटुंबातील इतर कोणतेही सदस्य जबाबदार राहणार नाहीत, कारण मी माझा सदर मुलगा दिनेश गोपीलाल संघवी** याच्याशी कायमस्वरूपी व अंतिम स्वरूपात **संबंधविच्छेद केला आहे.**

**सही/-**
**वकील श्री. के. आर. पांडे**
**वकील व नोटरी भारत सरकार,**
भांडारकर कॉम्प्लेक्स, कोर्ट लेन, पोस्ट ऑफिसजवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२
ठिकाण: मुंबई दिनांक: ०६.०६.२०२६

**जाहीर सूचना**

नोंद घ्यावी की, निलेश रमेशचंद्र पारिख उर्फ निलेशकुमार रमेशचंद्र पारिख हे खालील अनुसूचीत लिखित वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त अशी विकू इच्छितात आणि आमचे अशिल ती खरेदी करू इच्छितात.

सर्व आणि/किंवा कोणा व्यक्तीस मालमत्तेच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, शिर्षक, दावा, हितसंबंध किंवा आक्षेप असलेले किंवा दावा असलेले मग ते विक्री, देवाणघेवाण, नियुक्ती, भेटवस्तू, मृत्युपत्र, तारण, देणगी, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, वहिवाट, उप-वहिवाट, निवासी भाडे करार, परवाना करार, गहाणखत, अधिभार, धारणाधिकार, शुल्क, न्यास, वारसा, उत्तराधिकार, करार, कंत्राट, सामंजस्य करार, व्यवसाय, ताबा, कुटुंब व्यवस्था तडजोड, देखभाल, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, प्रलंबित खटले, जोडपत्र, आरक्षण, सुविधा किंवा कोणतेही दायित्व किंवा वचनबद्धता किंवा अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत कोणत्याही स्वरूपाची मागणी किंवा अन्यथा काहीही असो याद्वारे विनंती केली जाते की, दावेदार ज्या कागदपत्रांवर अवलंबून आहे त्या कागदपत्रांसह खाली नमूद केलेल्या कार्यालयात त्यांना या सूचनेचे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत, जर असेल तर, सर्व सहाय्यक कागदपत्रांसह, लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल आणि अशा व्यक्तीचे दावे, जर असतील तर, माफ मानले जातील आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

**मालमत्ता/फ्लॅट ची अनुसूची**

२३२, वाळकेश्वर रोड, मुंबई - ४०० ००६ येथील वाळकेश्वर मेकर अपार्टमेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड अंतर्गत येणाऱ्या मेकर अपार्टमेंट्स या इमारतीतील २ऱ्या मजल्यावर स्थित, अंदाजे ५०६ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ असलेला फ्लॅट क्र. २ए, जे मुंबई शहर नोंदणी उप-जिल्ह्यातील मलबार-कंबाला हिल विभागातील कॅडस्ट्रल सर्व्हे क्र.१११ असलेल्या भूखंडावर बांधकामित आहे, यासोबतच, वाळकेश्वर मेकर अपार्टमेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडचे प्रत्येकी पन्नास रुपये किमतीचे पाच पूर्णपणे भरणा झालेले शेअर्स, विशिष्ट क्र.०२१ ते ०२५ (दोन्ही समाविष्ट) असे आहेत आणि जे १९ ऑक्टोबर १९७२ रोजीच्या भाग प्रमाणपत्र क्र.५ अन्वये धारण केलेले आहेत आज दिनांकीत ०६ जून २०२६ रोजी

**सही/-**
**पार्श्व जयेश शाह,**
**इच्छुक खरेदीदाराचे वकील**
पत्रव्यवहाराचा पत्ता: द्वारा- सी. आर. नायडू अँड कं., १ला मजला, एक्झामिनर प्रेस इमारत, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१.
ईमेल: advparshvashah@gmail.com

**जाहीर सूचना - ई-लिलाव**
**मे. संघवी लॅण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**

**लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. ०६ जुलै, २०२६, दु. २.०० ते सायं. ६.००**

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने, मे. संघवी लॅण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) यांच्या प्रकरणामध्ये, निम्नस्वाक्षरीकार परिसमापक आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२(अ) सह वाचावयाच्या नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग असणाऱ्या मालमत्तेच्या विक्रीकरिता बोली मागवित आहेत. मालमत्ता **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** विक्री करणे प्रस्तावित आहे. विक्री आयबीबीआय मान्यताप्राप्त ई-लिलाव प्लॅटफॉर्म (बँकनेट) द्वारेः https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home येथे आयोजित करण्यात येईल.

**विक्रीचे संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहेतः**

| मालमत्तेचे संच | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (भारतीय रु.) | ईएमडी रक्कम (भारतीय रु.) | बोली विस्तार मूल्य (भारतीय रु.) |
|---|---|---|---|---|
| संघवी स्क्वेअर, एमजी रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई - ४०००८६ येथील मालमत्तेचे संच. | अ. व्यावसायिक जागाः<br>युनिट क्र. ५०७, ५वा मजला - ९७ चौ.फू. कार्पेट<br>युनिट क्र. ५११-५१२, ५वा मजला - १,४८९ चौ.फू. कार्पेट<br>युनिट क्र. ६०१-६०२, ६वा मजला - ३,४५० चौ.फू. कार्पेट<br>पार्किंग जागा - ६०० चौ.फू. कार्पेट<br>कार्यालयीन उपकरणे | रु. ४,२४,००,०००/- (रुपये चार कोटी चोवीस लाख मात्र) | रु. ४२,४०,०००/- (रुपये बेचाळीस लाख चाळीस हजार मात्र) | रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख मात्र) |

**लिलावाचे वेळापत्रक**

| अ. क्र. | वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १. | विक्री सुचनेची जाहीर उद्घोषणा आणि ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज | शनिवार, दि. ६ जून. २०२६ |
| २. | अर्ज करण्याचा आणि दस्तऐवज सादरीकरणाचा अंतिम दिनांक | शुक्रवार, दि. ३ जुलै, २०२६ |
| ३. | मालमत्तेची पाहणी/योग्य चौकशीकरिता दिनांक आणि वेळ (परिसमापकाकडून पूर्व परवानगीने) | शनिवार, दि. ६ जून, २०२६ ते शुक्रवार, दि. ३ जुलै, २०२६, स. १०.०० ते सायं. ५.०० |
| ४. | इसारा रक्कम अनामत (ईएमडी) जमा करण्याकरिता अंतिम दिनांक | शनिवार, दि. ४ जुलै, २०२६ रोजी सायं. ०८.०० वाजेपर्यंत |
| ५. | ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | सोमवार, दि. ६ जुलै, २०२६ - दु. ०२.०० ते सायं. ०६.०० (प्रत्येकी ५ मिनिटांचा स्वयं-विस्तार) |
| ६. | यशस्वी बोलीदाराची घोषणा | गुरुवार, दि. ९ जुलै, २०२६ |
| ७. | ईएमडीचा परतावा | शनिवार, दि. ११ जुलै, २०२६ |

**अटी आणि शर्ती**

१. विक्री सूचना https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home येथे किंवा परिसमापकाकडून विनंती केल्यावर उपलब्ध होणाऱ्या संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजासह वाचावी.
२. बोलीदारांनी त्यांच्या मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडीचा वापर करून https://ibbi.baanknet.com येथे नोंदणी करावी. पोर्टल सहाय्याकरिता, संपर्कः support.baanknet@psballiance.com/+९१ ८२९१२ २०२२०.
३. बोलीदारांनी शीर्षक, बोजा, वैधानिक देणी आणि इतर प्रभारांसंबंधी त्यांची स्वतःची योग्य चौकशी करावी. पूर्व परवानगी घेऊन मालमत्तांची पाहणी करता येईल. सर्व हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क आणि लागू कर यशस्वी बोलीदाराने भरावयाचे आहेत.
४. लागू दस्तऐवज आणि ईएमडी शनिवार, दि. ४ जुलै, २०२६ रोजी सायं. ०८.०० वाजेपर्यंत फक्त बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच सादर करावयाचे आहेत.
५. परिसमापक कायद्याने परवानगी असल्यानुसार कोणत्याही टप्प्यावर लिलाव रद्द करणे, सुधारित करणे किंवा पुढे ढकलणे किंवा विक्रीचे वेळापत्रक किंवा शर्तींमध्ये सुधारणा करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.
६. ईएमडी फक्त बँकनेट प्लॅटफॉर्मद्वारेच भरावयाची आहे. चुकीची माहिती देणे, लिलावाच्या अटींचे पालन न करणे किंवा बोली स्वीकारल्यानंतर ती मागे घेणे यांसारख्या कारणांमुळे अपात्र ठरल्यास, इसारा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
७. राखीव किंमत सर्व कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, टीडीएस आणि हस्तांतरण प्रभार वगळून आहे. मालमत्तेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या हमी किंवा नुकसानभरपाई देण्यात येणार नाहीत.
८. मालमत्ता **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** विक्री करण्यात येणार आहेत. मालमत्तेमधील कोणत्याही कमतरता, दोष किंवा बोजा याबाबत परिसमापक कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही.
९. विक्री नादारी आणि दिवाळकोरी संकेत, २०१६ आणि आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या तरतुदींच्या अधीन आहे. सर्व बोलीदारांनी आयबीसीच्या कलम २९ए अन्वये पात्रतेसंबंधी स्वतःचे समाधान करून घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
१०. **मालमत्तेचे प्रकटीकरणः** बृमुंमपा आणि संस्थेचा रु. २,१८,४६,५००/- चा दावा आहे. बोलीदारांनी त्यांची स्वतःची स्वतंत्र योग्य चौकशी करावी आणि बोली लावावी. परिसमापकांनी कॉर्पोरेट ऋणको, बँका आणि बृमुंमपाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या दस्तऐवजांच्या आधारे माहिती सामायिक केली आहे; तथापि, परिसमापकाची कोणतीही दायित्व नाही. काही अटी आणि शर्ती लागू आहेत आणि त्या प्रक्रिया ज्ञापनामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. **युनिट क्र. ६०१-६०२, ६वा मजला - ३,४५० चौ.फू. कार्पेट चे भोगवटा प्रमाणपत्र नाही. कृपया इमारतीचा आयओडी, सीसी आणि प्लान पहावा.**
११. शिल्लक विक्री मोबदल्याचा भरणा यशस्वी बोलीदाराच्या घोषणेच्या ३० दिवसांमध्ये (व्याजाशिवाय) किंवा ९० दिवसांमध्ये (दरसाल १२% व्याजासह) भरणा करावा. भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास ईएमडी जप्त करण्यात येईल आणि विक्री रद्द करण्यात येईल.

**संघवी लॅण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड** नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये परिसमापन प्रक्रियेमधून जात असल्यामुळे, सर्व इच्छुक बोलीदारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी sanghvilanddevelopers@gmail.com येथे लिहून निम्नस्वाक्षरीकारांशी संपर्क साधावा.

**सही/-**
**उमेश चंद्रा साहू**
**मे. संघवी लॅण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक**
IBBI/IPA-002/IP-N00621/2018-19/11855
**नोंदणीकृत पत्ताः** भूखंड क्र. २८२, दुकान क्र. ३, पहिला मजला, इसेन सिटी सेंटर, कटक रोड, भुवनेश्वर - ७५१००६, ओदिशा
संपर्क क्र.: ८८९५४७६१०० । नोंदणीकृत ईमेलः info@nayadarshan.com
प्रक्रिया विशिष्ट ई-मेलः sanghvilanddevelopers@gmail.com

**दिनांकः ०६ जून, २०२६**
**ठिकाणः भुवनेश्वर**

# विप्रो कंपनीत धर्मांतराचा प्रयत्न! तपासात सहकार्य करण्याची ग्वाही




**पुणे -** नाशिकच्या टीसीएसनंतर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी) दिग्गज कंपनी विप्रोमध्ये बळजबरी धर्मांतराचा प्रयत्न झाल्याचा आरोप एका महिला कर्मचाऱ्याने केल्याने खळबळ माजली आहे. या प्रकरणी पुणे पोलीस सध्या विप्रो कंपनीची चौकशी करत आहेत. या तपासकामात कंपनी पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही कंपनीच्या वतीने देण्यात आली आहे. विप्रोमध्ये प्रकल्प व्यवस्थापकपदी काम करणाऱ्या या महिलेने आरोप केला आहे की, कंपनीत वरिष्ठ पदावर असलेल्या महिलेने आपल्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी सातत्याने दबाव आणला. आपल्याला कंपनीतून राजीनामा देण्यास भाग पाडले. या महिलेने कंपनीतील एक मुस्लीम पुरुषाशी शरीर संबंध ठेवण्यासाठी दबाव आणला. हिंदू धर्माचा त्याग करण्यास सांगितले होते. या महिलेच्या तक्रारीवरून पुणे पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. याबाबत बोलताना कंपनीच्या वतीने सांगण्यात आले की, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि त्यांचा उचित सन्मान राखणे याला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देतो. कामाच्या ठिकाणी कोणत्याही आधारावर भेदभावाला आमच्याकडे स्थान नाही. पोलीस करत असलेल्या तपासाला आम्ही पूर्ण सहकार्य करू. जो कोणी दोषी आढळेल त्याला कायद्याने शिक्षा होईल.

# अभिजीत दीपकेस अनावृत पत्र

**प्रिय,**
**अभिजित दीपके**
संस्थापक, कॉक्रोच जनता पार्टी.

आपल्या पूर्वजांनी ज्या आदर्श भारताचे स्वप्न पाहिले होते, ते आदर्श सत्ताधाऱ्यांनी कधीच पायदळी तुडवले आहेत. ज्या संविधानिक मूल्यांच्या आधारावर हा देश उभा आहे, त्याचा पायाच उद्ध्वस्त केला गेला आहे. हा देश आता पूर्वीचा महान भारत उरला नाही मित्रा. ह्या देशातली लोकशाही ईव्हीएमच्या ईलेक्ट्रिक कबरीत जिवंतपणे गाडली गेली आहे. त्यातल्या लोकांचा आवाज म्यूट करून त्याचे रूपांतरण केवळ एका बीपमध्ये केले आहे. सामाजिक न्यायाला न्यायालयांकरवीच फाशीची शिक्षा सुनावली गेली आहे आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना तुरुंगात डांबले गेले आहे.



मित्रा,

तू बेरोजगार तरुणांना कॉक्रोच म्हटल्याने चवताळून उठलास. पण आज देशातल्या तरुणांचे जीवन किड्या मुंग्यांपेक्षाही भयंकर बनले आहे. त्यांचे भविष्य व्यवस्थेने बेरहमपणे चिरडून टाकले आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराची क्षेत्रे संपूर्णपणे नेस्तनाबूत केली आहेत. त्याविरोधात उठणारे न्याय हक्काचे प्रत्येक आवाज दाबून टाकले जात आहेत. जे दबले जात नाही, त्यांना मुस्लीम दहशतवादी, पाकिस्तानी, परकीय शक्तींचे हस्तक वा अर्बन नक्षलवादी ठरवून निकाली काढले जाते. तरीही जे आवाज निकाली निघत नाहीत, त्यांना एका गूढ निर्वात पोकळीत ढकलून कायमचे बंद केले जाते. त्याची मीडियात साधी चर्चाही होऊ दिली जात नाही. लोकशाहीचा चौथा स्तंभ सत्तेला तोलून धरण्यात खर्ची पडला आहे.

मित्रा,

त्यांना ही सत्ता सहजासहजी मिळालेली नाही. त्यासाठी त्यांनी जीवाचे रान केलेले आहे. शंभर वर्षांच्या अथक कट कारस्थानाचे हे फलित आहे. त्यामुळे तुझ्या मोबाईल स्क्रीनवरच्या आभासी आंदोलनाने ते इतक्या सहजपणे सत्तेवरून पायउतार होतील असे अजिबात नाही.

मित्रा,

तरीही तू जरा सांभाळून राहा. कारण ते प्रचंड कपटी, खुनशी आणि नीच आहेत. सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी येणारा प्रत्येक अडसर त्यांनी निर्दयपणे उखडून फेकला आहे. कार सेवकांच्या जळालेल्या अस्थिंचे अमानुष प्रदर्शन भरवून नियोजनबद्धरित्या आग लावली आणि त्यात हजारो माणसं जळून राख झाली. हरेन पांड्यासारखा आपल्याच गृहमंत्र्याला बंदुकीच्या नळीत बसवून थेट मोक्षधामाला पाठवून दिले. कितीतरी निष्ठावान स्वयंसेवकांना फुकटातली स्वर्गाची सफर घडवली. जज लोयासारख्या इमानदार न्यायाधीशाला बक्षीस म्हणून हृदयविकाराचा झटका दिला. पुलवामा हल्ल्यात चाळीस सैनिकांना देशासाठी शहीद होण्याचे महदभाग्य प्राप्त करून दिले. कृषी कायद्याविरोधात आंदोलन करणाऱ्या सातशेच्यावर शेतकऱ्यांना बलिदानासाठी सताड दारं उघडून ठेवली. विजय रूपाणीसाठी पाठवलेल्या पुष्पक विमानात चारशेच्यावर प्रवाशांना सदेह वैकुंठागमन घडवले. भीमाकोरेगावच्या शौर्यस्तंभाला ॲक्टिव्हिस्टांचा वधस्तंभ बनवला. सोनम वांगचूकसारख्या लढावू कार्यकर्त्याला लडाखच्या बर्फाळ प्रदेशातून उचलून थेट तुरुंगाची उब दिली. ह्या उजेडात आलेल्या काही कपट कथा. पण अंधारात अजून काय काय घडलं असेल याची कल्पनाही तुला नसेल!

मित्रा,

जिथे अजित पवार सारख्या उपमुख्यमंत्र्याला देखील बक्षले नाही, तिथे तू किस झाड की पत्ती? एकतर तयार केलेल्या खोट्या गुन्ह्यात अडकवून तुला तुरुंगाच्या अंधारकोठडीत वर्षानुवर्षे कुजवत ठेवतील किंवा बटूच्या महाकाय पायाखाली तुझ्यासारख्या कोक्रोचांना चिरडून ठार करतील. तसेही क्रॉक्रोच मेल्याचे दुःख कुणाला होणार आहे? सत्तेच्या गुलाम बनलेल्या मीडियावर दोन दिवस तुझ्यावर उलटी सिधी बात घडेल आणि तिसऱ्या दिवशी एखाद्या बाबा, अभिनेत्री, क्रिकेटपटू किंवा व्हायरल व्हिडिओकडे राष्ट्राचे लक्ष वळवून तुला विस्मरणाच्या निर्वात पोकळीत ढकलून देतील.

तरीही अभिजित, जर तू प्रश्न विचारत असशील तर तुला सलाम. कारण या काळात प्रश्न विचारणे हेच सगळ्यात मोठे साहस आहे आणि स्मरणशक्ती जपणे हा सर्वात मोठा गुन्हा!

हा गुन्ह्यासाठी तुला लाख लाख शुभेच्छा!!

जय हिंद! जय भारत!!

**- एक भारतीय नागरिक**

# काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा द्या
## नॅशनल कॉन्फरन्स आंदोलन करणार

■ श्रीनगर

**जम्मू** आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिल्लीत आंदोलन करणार आहेत. नॅशनल कॉन्फरन्सचे प्रवक्ते तन्वीर सादिक यांनी ही माहिती दिली. महत्त्वाची बाब म्हणजे नॅशनल कॉन्फरन्सने २०२४ च्या जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जनतेला दिलेली आश्वासने पाळलेली नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या सरकारला सध्या प्रचंड टीकेचा सामना करावा लागत आहे. जम्मू काश्मिरमध्ये लागू असलेले कलम ३७० रद्द करून राज्याचे विभाजन करताना केंद्र सरकारने जम्मू काश्मिरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता अद्याप करण्यात आलेली नाही. त्यामुळे हा मुद्दा थेट राजधानी दिल्लीत मांडण्याचा निर्णय नॅशनल कॉन्फरन्सच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

# मी सावित्रीबाई जोतिराव फुले मालिका बंद होणार? चर्चांना उधाण

■ मुंबई

**ऐतिहासिक** विषयावर आधारित मी सावित्रीबाई जोतिराव फुले ही मालिका बंद होणार असल्याच्या चर्चांना जोर आला असून, मालिकेचे निर्माते आणि प्रमुख अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. ऐन महत्त्वाच्या टप्प्यावर मालिका थांबणार असल्याच्या चर्चेमुळे प्रेक्षकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये डॉ. अमोल कोल्हे हे मालिकेतील कलाकार आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना दिसत आहेत. कोणतीही परिस्थिती उद्भवली तरी मालिका अर्धवट सोडली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी संपूर्ण टीमला दिला आहे. तसेच वाहिनीकडून किंवा आर्थिक कारणांमुळे निर्मितीवर ताण आला तरी स्पॉट बॉयपासून ते प्रमुख कलाकारांपर्यंत कोणाच्याही मानधनात कपात केली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.




मालिका पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या मानधनात किंवा निर्माते म्हणून आर्थिक तडजोड करावी लागली, तरी त्यासाठी तयार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मालिकेचा टीआरपी अपेक्षेप्रमाणे नसल्याचे कारण देत निर्मात्यांसमोर बजेटमध्ये तब्बल ५० टक्के कपात करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

# व्हीगन उत्पादनांवर नवा लोगो
## १ जुलै २०२७ पासून बंधनकारक

■ मुंबई



**व्हीगन** खाद्यपदार्थ खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आता अशी उत्पादने सहज ओळखता येणार आहेत. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने व्हीगन खाद्यपदार्थांसाठी प्रमाणित लोगो जाहीर केला आहे. १ जुलै २०२७ पासून सर्व मान्यताप्राप्त व्हीगन उत्पादनांच्या पॅकेजिंगवर हा लोगो लावणे बंधनकारक असणार आहे.

फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स रेग्युलेशन्समधील सुधारित तरतुदींनुसार प्रत्येक प्रमाणित व्हीगन उत्पादनावर हिरव्या रंगातील व्हीगन लोगो प्रदर्शित करावा लागेल. या निर्णयामुळे ग्राहकांना व्हीगन आणि इतर खाद्यपदार्थांमधील फरक स्पष्टपणे ओळखता येणार आहे. नव्या लोगोमध्ये हिरव्या चौकटीत पानासह 'व्ही' हे चिन्ह असेल. हा लोगो संबंधित उत्पादन व्हीगन मानकांनुसार प्रमाणित असल्याचे तसेच त्यामध्ये कोणताही प्राणिजन्य घटक नसल्याचे दर्शवेल. एफएसएसएआयने जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे या लोगोचा वापर आणि त्यासंबंधीचे निकष निश्चित केले आहेत.

# सुनेत्रा पवारांच्या रिक्त जागेवर नवनीत राणा?
## सलग भेटींमुळे चर्चांना उधाण

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. १८ जून रोजी या जागेसाठी मतदान होणार असून, त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील ही जागा असल्याने उमेदवाराच्या निवडीवर राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार नवनीत राणा यांचे नाव अचानक चर्चेत आले आहे. राज्यसभेच्या उमेदवारीसाठी त्यांनी सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची भेट घेतल्याची माहिती आहे. त्यानंतर नवनीत राणा आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली. या सलग भेटींमुळे संभाव्य राजकीय समीकरणांबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

या जागेसाठी सुरुवातीला राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत होते. मात्र पक्ष नेतृत्व त्यांना केंद्रात पाठवण्याबाबत साशंक असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे इतर पर्यायांवरही विचार सुरू असल्याचे समजते. पक्षांतर्गत चर्चेत सुबोध मोहिते-पाटील, अविनाश आदिक आणि प्रमोद हिंदुराव यांच्यासह काही नावांवरही विचार सुरू असल्याची माहिती आहे.

# भारताने अमेरिकेचा फायदा घेतला
## आता अमेरिका कमाई करते आहे

■ वॉशिंग्टन

**भारताने** दीर्घकाळापासून अमेरिकेवर उच्च शुल्क (टॅरिफ) लावून त्याचा फायदा घेतला. आता परिस्थिती बदलली आहे. अमेरिका भारताकडून चांगली कमाई करत आहे, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापाराबद्दल बोलताना केला.

ट्रम्प म्हणाले की, वर्षानुवर्षे भारताने अमेरिकेचा गैरफायदा घेतला. त्यांनी आमच्यावर प्रचंड जकात लावली व काहीही दिले नाही. आता परिस्थिती अगदी उलट आहे व आम्ही भारतासोबत भरपूर पैसा कमावत आहोत. पण आम्ही करार करूच.

**डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा**

अमेरिका आणि भारत यांच्यात लवकरच एक मोठा व्यापार करार होऊ शकतो. कारण मला मोदी खूप आवडतात. मोदी माझे खूप चांगले मित्र आहेत. आमचे संबंध चांगले आहेत. आम्ही एकमेकांना चांगले समजून घेतो. भारतासह ६० देशांमधून होणाऱ्या आयातीवर त्यांच्या प्रशासनाने अतिरिक्त १२.५ टक्के शुल्क लावण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ट्रम्प यांनी हे वक्तव्य केले आहे. सक्तीच्या मजुरीशी संबंधित प्रकरणे रोखण्यासाठी हे देश पुरेशी पावले उचलत नाहीत, असा अमेरिकेचा दावा आहे. दुसरीकडे अमेरिकेच्या एका पथकाने नुकतीच भारत सरकारच्या अधिकाऱ्यांसोबत व्यापार कराराबाबत चार दिवसांच्या वाटाघाटी केल्या.

# खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली

■ मुंबई

**महाराष्ट्रात** विधान परिषद निवडणुकीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे २५ ते ३० मिनिटे चर्चा झाली. या दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. ही केवळ सौजन्यभेट होती की, यामागे आगामी राजकीय घडामोडींची एखादी नवी रणनीती आहे? याविषयी विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. या भेटीपूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत खा. संजय राऊत यांनी विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेवर टीका केली. राऊत म्हणाले की, बिनविरोध निवडणुका घडवून आणण्यासाठी सुरू असलेल्या हालचालींमध्ये व उमेदवारांना माघार घ्यायला लावण्यासाठी एका दिवसात किमान १५० कोटी रुपयांचा खर्च झाल्याची चर्चा आहे.

# नसरापूर प्रकरण! मुलीच्या अंगावरील ओरखडे झटापटीतून

■ पुणे **ससूनच्या डॉक्टरांची कोर्टात साक्ष**

**नसरापूर** अत्याचार आणि हत्या प्रकरणात चिमुकलीच्या अंगावर आढळलेले ओरखडे हे कोणत्याही हत्याराचे नसून आरोपीसोबत झालेल्या झटापटीदरम्यान पडलेले असल्याची साक्ष ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी न्यायालयात नोंदवली. शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांनी न्यायालयात सादर केलेल्या अहवालानुसार, पीडितेवर मृत्यूपूर्वी लैंगिक अत्याचार झाला होता. अत्याचार आणि त्यानंतरच्या झटापटीत तिच्या अंगावर ओरखडे निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सुरू असून, सरकार पक्षातर्फे एकूण ८२ साक्षीदारांची यादी सादर करण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत ३० साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. साक्षीदारांमध्ये कुटुंबीय, शोध पथक, सीसीटीव्ही संदर्भातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच बालसाक्षीदारांचा समावेश आहे.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत दानवे-सावेंचा अर्ज

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती संभाजीनगर** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला असून, जिल्ह्यातील दिग्गज नेते थेट मैदानात उतरले आहेत. या निवडणुकीसाठी उबाठा गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी संचालक पदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर भाजपातर्फे राज्याचे सहकार मंत्री अतुल सावेंनी अर्ज भरला आहे.

दुसरीकडे, महायुतीनेही या निवडणुकीसाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. भाजपाकडून अतुल सावे यांच्याव्यतिरिक्त शहराध्यक्ष किशोर शितोळे, माजी नगरसेवक राजू शिंदे आणि पुनमचंद बमणे यांनी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरले. आमदार संजना जाधव, मंत्री अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव अब्दुल समीर आणि बँकेचे विद्यमान अध्यक्ष अर्जुन गाढे यांनीही अर्ज दाखल केले आहेत. आतापर्यंत जिल्हा बँकेवर माजी मंत्री अब्दुल सत्तार यांचा प्रभाव होता.

# एक घर, एक गॅस कनेक्शन देशात नवा नियम लागू
## केंद्र सरकारचा निर्णय

■ नवी दिल्ली

**मध्य पूर्व** आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने 'एक घर, एक गॅस कनेक्शन' हा नवा नियम लागू केला आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

नव्या नियमानुसार, ज्या घरांमध्ये पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) कनेक्शन उपलब्ध आहे, त्यांनी आपले एलपीजी कनेक्शन ३० दिवसांत सरेंडर करणे आवश्यक आहे. अन्यथा इंडेन, भारत गॅस किंवा एचपी गॅसचे कनेक्शन रद्द केले जाऊ शकते. सरकारने स्पष्ट केले आहे की, एकाच वेळी एलपीजी व पीएनजी दोन्ही कनेक्शन ठेवणे हे सुधारित गॅस नियंत्रण आदेशाचे उल्लंघन



मानले जाईल. या पार्श्वभूमीवर ऑईल मार्केटिंग कंपन्यांनी कारवाईला सुरुवात केली असून, दुहेरी कनेक्शन असलेल्या ग्राहकांची माहिती डेटाबेसद्वारे तपासली जात आहे. त्याचबरोबर ज्या घरांमध्ये पीएनजी सुविधा उपलब्ध असूनही ग्राहकांनी त्यावर स्विच केले नाही.

# भारत पुढील ६ महिन्यांत तीन व्यापार करार करणार

■ नवी दिल्ली **वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांची माहिती**

**भारत** सरकार पुढील ६ महिन्यांत २ ते ३ महत्त्वपूर्ण मुक्त व्यापार करार पूर्णत्वास नेऊन लागू करणार आहे. नुकताच ओमानसोबतचा व्यापार करार लागू झाला असून येत्या काळात अमेरिका आणि ब्रिटनसह अन्य प्रमुख देशांसोबतचे करार अंतिम टप्प्यात आहेत, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले की, भारताने यापूर्वीच मॉरिशस, युएई, ऑस्ट्रेलिया, ओमान सोबतचे व्यापारी करार लागू केले आहेत. तर ब्रिटन आणि न्यूझीलंडसोबतच्या स्वतंत्र करारावरही स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. १ जून रोजी, ओमान-मुक्त व्यापार करार अंमलात आला. आगामी सहा महिन्यांत, आणखी किमान दोन किंवा तीन अत्यंत महत्त्वपूर्ण मुक्त व्यापार करार अंमलात येताना दिसतील. पुढील वर्षभरात आम्ही आणखी किमान तीन किंवा चार महत्त्वपूर्ण मुक्त व्यापार करारांची अंमलबजावणी करणार आहोत.

नवा काळ विजय
उद्या वाचा



अग्निसुरक्षेबाबतच्या अनास्थेचा परिपाक

शिक्षकांच्या गुणवत्तेची 'परीक्षा'

'सुपर एल निनो'चा भयकंप



# गडचिरोलीत शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन दुसऱ्या दिवशीही सुरू

■ गडचिरोली

**प्रस्तावित** विमानतळ आणि जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी सुरू असलेल्या जमीन अधिग्रहणाच्या विरोधात गडचिरोलीतील शेतकऱ्यांचे बेमुदत ठिय्या आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. सुपीक जमीन मोठ्या प्रमाणात अधिग्रहित होत असल्याने संतप्त झालेल्या वीसहून अधिक गावांतील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत आहेत.

कालपासून सुरू झालेल्या या आंदोलनात हजारो शेतकरी सहभागी झाले असून, अनेकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच मुक्काम ठोकला आहे. काल रात्रीही शेतकऱ्यांनी परिसरातच झोपून आपला निषेध कायम ठेवला. विमानतळासाठी होणाऱ्या जमीन अधिग्रहणाला १४ गावांतील शेतकऱ्यांचा



विशेष विरोध आहे. 'एमआयडीसी विमानतळ नको, आमची सुपीक जमीन आम्हालाच राहू द्या' अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

# अन्नामलाईंचा राजीनामा मंजूर
## भाजपाला अखेरचा रामराम

■ चेन्नई

**गेल्या** काही दिवसांपासून चर्चेत असलेले तामिळनाडूतील भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी अखेर पक्षाला अखेरचा रामराम ठोकला. तामिळनाडूमध्ये भाजपा पक्ष वाढवण्यात अन्नामलाई यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

अन्नामलाई यांनी २ जून रोजी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन आपण पक्ष का सोडत आहोत याची कारणे सांगितली होती. शहा यांनी त्यांना दिल्लीतच थांबण्यास सांगितले होते. मात्र पक्ष सोडण्यावर अन्नामलाई ठाम राहिले. अखेर त्यांचा राजीनामा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी स्वीकारला. त्यामुळे अन्नामलाई यांच्या भाजपा सोडण्यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे.

# सहारा वाळवंटात ट्रक बंद पडला तहान-उष्णतेने ४९ जणांचा मृत्यू

■ नायजर

**पश्चिम** आफ्रिकेतील सहारा वाळवंटात प्रवाशांनी भरलेला ट्रक अचानक बंद पडल्याने तीव्र उष्णता आणि पिण्याच्या पाण्याच्या अभावामुळे तब्बल ४९ प्रवाशांचा मृत्यू झाला. केवळ दोन जण सुदैवाने बचावले. हे सर्वजण एका मुस्लीम सणानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होऊन मालीमधून परतत होते.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

नायजरमधील अगादेज गव्हर्नरेटने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, हा ट्रक अस्सामाका येथून सुमारे ८० किलोमीटर अंतरावरील दुर्गम भागात अडकला होता. अस्सामाका हे नायजर आणि अल्जीरिया यांच्या सीमेवरील महत्त्वाचे केंद्र असून, ते मालीच्या सीमेजवळ स्थित आहे. प्रवासादरम्यान ट्रक अचानक नादुरुस्त झाला. चालक, त्याचे सहकारी आणि प्रवाशांनी वाहन दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र त्यांना यश आले नाही. दरम्यान, पिण्याचे पाणी पूर्णपणे संपले.